# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१७८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.९ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## बांगलादेशातील हिंदूंच्या सुरेक्षेसाठी भारताचे मोठे पाऊल गृहमंत्री अमित शाह यांनी केली समितीची स्थापना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नवी दिल्ली**

बांगलादेशात गेल्या काही दिवसापासून नोकरीतील आरक्षणावरुन विद्यार्थ्यांनी निदर्शने सुरू केली आहेत. दरम्यान, पंतप्रधान शेख हसीना यांनी राजीनामा दिला आहे. पण, तरीही बांगलादेशातील गोंधळ थांबलेला नाही. आता बांगलादेशातील हिंदूंना लक्ष केले जात असल्याची माहिती समोर आली. यावर आता केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी मोठं पाऊल उचलले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी घोषणा केली की, बांगलादेशातील सध्याची परिस्थिती पाहता, भारत-बांगलादेश सीमेवरील सध्याच्या परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी मोदी सरकारने एक समिती स्थापन केली आहे. भारतीय नागरिक, हिंदू आणि तेथे राहणाऱ्या इतर अल्पसंख्याक समुदायांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी समिती बांगलादेशातील आपल्या समकक्ष अधिकाऱ्यांशी संवाद साधेल.

याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ट्विट करुन माहिती दिली. बांगलादेशातील सध्याची परिस्थिती पाहता, भारत-बांगलादेश सीमेवरील




(खइइ) सध्याच्या परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी मोदी सरकारने एक समिती स्थापन केली आहे. भारतीय नागरिक, हिंदू आणि तेथे राहणाऱ्या इतर अल्पसंख्याक समुदायांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी समिती बांगलादेशातील आपल्या समकक्ष अधिकाऱ्यांशी संवाद साधेल. ही समिती एडीजी, सीमा सुरक्षा दल, पूर्व कमांड यांच्या नेतृत्वाखाली असेल, असं ट्विटमध्ये म्हटले आहे.

बांगलादेशातील भारतीय आणि हिंदू समुदायाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे गृहमंत्र्यांनी स्पष्ट केले. ही समिती भारत-बांगलादेश सीमेवरील सुरक्षा आणि परिस्थितीवर लक्ष ठेवण्याचे काम करते. बांगलादेशात नुकत्याच झालेल्या अशांततेच्या पार्श्वभूमीवर भारतीय नागरिक आणि अल्पसंख्याक समुदायांच्या सुरक्षेच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर हे पाऊल उचलण्यात आले आहे.

अनेक हिंदू मंदिरे, घरे आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांची तोडफोड करण्यात आली आहे, आणि अवामी लीगशी संबंधित किमान दोन हिंदू नेते पंतप्रधान शेख हसीना यांनी सोमवारी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर आणि देश सोडून भारतात गेले. बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदू समुदायावरील हल्ल्यांच्या घटनांदरम्यान, संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांचे प्रवक्ते म्हणाले की, ते वांशिक कारणास्तव कोणत्याही प्रकारच्या हल्ल्यांना किंवा हिंसाचाराला उत्तेजन देण्याच्या विरोधात आहेत. बांगलादेशातील हिंदू आणि अन्य अल्पसंख्याक समुदायांवरील हल्ल्यांबाबत महासचिवांच्या प्रतिक्रियेशी संबंधित प्रश्नांना ते उत्तर देत होते.

## हसीनांची जबाबदारी घेतली आता शत्रूला मदत केली तर...; खलेदा झियांच्या पक्षाचा भारताला इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ ढाका**

बांगलादेशमध्ये गेल्या आठवड्यापासून सुरू असलेल्या राजकीय गोंधळाच्या पार्श्वभूमीवर मोहम्मद युनूस यांनी अंतरिम सरकारची सूत्रे हाती घेतली आहेत. दुसरीकडे, हिंसक आंदोलनानंतर शेख हसीना यांनी आल्या पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन सोमवारी (५ ऑगस्ट) बांगलादेशमधून पलायन केले आणि त्या भारतात आल्या आहेत. हसीना यांनी ब्रिटनकडे राजकीय आश्रय मागितला असला तरी अद्याप ब्रिटनने त्यांना त्यासाठी परवानगी दिलेली नाही. त्यामुळे शेख हसीना या आणखी काही काळ भारतातच राहणार असण्याची शक्यता आहे. मात्र दुसरीकडे, शेख हसीना यांच्या कट्टर विरोधक असलेल्या खलेदा झिया यांच्या पक्षाने भारताला इशारा दिला आहे.

खलेदा झिया यांचा राजकीय पक्ष बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने शेख हसीना यांना भारताने आश्रय दिल्यावरून नाराजी व्यक्त केली आहे. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने भारताने पदच्युत शेख हसीना यांना दिलेल्या आश्रयाला विरोध केला. खलेदा झिया यांच्या पक्षाचे जेष्ठ नेते आणि बांगलादेशचे माजी मंत्री गायेश्वर रॉय यांनी याबाबत भाष्य केलं आहे. तुमच्या पक्षात भारतविरोधी भावना आहेत का सवाल रॉय यांना करण्यात आला होता. त्यावर उत्तर देताना रॉय यांनी बांगलादेश आणि भारत यांनी परस्पर सहकार्य केले पाहिजे, असं म्हटलं. तसेच भारत सरकारला परस्पर सहकार्याच्या भावनेनुसार वागावे लागेल असेही रॉय यांनी म्हटलं आहे.

## जगदीप धनखड यांच्या विरोधात विरोधत आक्रमक महाभियोग प्रस्ताव आणण्याची तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नवी दिल्ली**

सध्या सुरू असलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये राज्यसभेत सभापती जगदीप धनखड आणि विरोधी पक्षांच्या सदस्यांमध्ये वारंवार खटके उडत आहेत. दरम्यान, आज खासदार जया बच्चन यांनी सभापतींनी केलेल्या उल्लेखावर आक्षेप घेतल्यानंतर विरोधक आणि सभापती पुन्हा एकदा आमने सामने आले आहेत. तसेच सभापतींनी माफी मागावी, अशी मागणी जया बच्चन आणि विरोधकांकडून करण्यात येत आहे. त्याबरोबरचा सभापतींविरोधात महाभियोग प्रस्ताव आणण्याची तयारीही राज्यसभेतील विरोधी पक्षांनी केली असून, त्यासाठी विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्या कार्यालयात महाभिगोय प्रस्तावावर सदस्यांच्या सह्या घेतल्या जात आहेत.



जगदीप धनखड यांच्याविरोधात महाभियोग प्रस्ताव आणण्याची तयारी विरोधकांनी केल्याचं वृत्त एबीपी न्यूजसह काही हिंदी वृत्तवाहिन्यांनी दिलं आहे. महाभियोग प्रस्ताव आणण्यासाठी १४ दिवसांची नोटिस द्यावी लागते. त्यादृष्टीने विरोधकांनी हालचाली सुरू केल्या आहेत. महाभियोग प्रस्ताव दोन तृतियांश बहुमताने पारित झाला, तर सभापतींना पद सोडावं लागू शकतं. मात्र सध्या राज्यसभेमध्ये सत्ताधारी एनडीएकडे बहुमत नसलं तरी बहुमताच्या जवळपास जाणारं संख्याबळ आहे. तसेच राज्यसभेत सत्ताधारी आणि विरोधी अशा दोन्ही गटांमध्ये नसलेलेही अनेक पक्ष आणि खासदार आहेत. त्यामुळे आता या अविश्वास प्रस्तावाबाबत विरोधक पुढे काय भूमिका घेतात हे पाहावं लागेल.

दरम्यान, आजच्या राज्यसभेच्या कामकाजादरम्यान जया बच्चन यांनी सभापती जगदीप धनखड यांच्यावर गंभीर आरोप केले. त्या म्हणाल्या की, मी जया अमिताभ बच्चन, आज हे सांगू इच्छिते की मी एक कलाकार आहे, मला इतरांची देहबोली (बॉडी लँग्वेज) आणि चेहऱ्यावरील हावभाव समजतात. पण मला माफ करा सर, पण तुमचा बोलण्याचा टोन हा स्वीकारार्ह नाही. आपण सहकारी आहोत, असे जया बच्चन म्हणाल्या.

त्यानंतर सभापती जगदीप घनखड म्हणाले की, जया जी, तुम्ही खूप नाव कमावलं आहे. सारे तुमचा आदर करतात. पण तुम्हाला माहिती असेल की अभिनेत्याला कुठली गोष्ट कशी सांगायची हे दिग्दर्शकाला योग्य माहिती असते. तुम्ही काही गोष्टी तिथे बसून पाहू शकत नाही, ज्या मी या खुर्चीत बसून पाहू शकतो. दररोज मला हे पुन्हा असा प्रकार नकोय. मी येथे पाहून बऱ्याच गोष्टी पाहिल्या आहेत. तुम्ही माझ्या टोन बाबत बोलताय... आता बास झालं... तुम्ही भले सेलिब्रिटी असाल पण तुम्हाला सदनाचे पावित्र्य राखावेच लागेल. मी हे सारखं सारखं सहन करणार नाही.

## विधानसभेचे बिगुलं वाजले....

## महाविकास आघाडी १६ ऑगस्टला प्रचाराचा फोडणार नारळ तर महायुती २० ऑगस्टला सुरू करणार प्रचार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुती विरुद्ध महाविकास आघाडीसाठी दोघांनीही दंड थोपटलेले पाहायला मिळत आहेत. महायुतीच्या पाठोपाठ महाविकास आघाडीनेही आता राज्यभर सभा बैठका संवाद यात्रा सुरू करणार आहे. महाविकास आघाडी १६ ऑगस्ट ला प्रचाराचा नारळ फोडणार आहे तर महायुती २० ऑगस्टला आपला प्रचार सुरू करणार आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांकडे महाराष्ट्रसह संपूर्ण देशाच लक्ष लागले आहे. आपली सत्ता कायम ठेवण्यासाठी युतीची धडपड सुरू आहे. तर सत्ताधारी युतीला सत्तेवरून खेचण्यासाठी महाविकास आघाडी एकही संधी सोडत नाही.जाणून घेऊया सत्ताधारी आणि विरोधकांची नेमकी रणनीती काय आहे?

विधानसभेच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीची पहिली सभा मुंबईमध्ये १६ ऑगस्टला षण्मुखानंद हॉलमध्ये पार पडणार आहे. या सभेला शरद पवार, उद्धव ठाकरे,




नाना पटोले आणि महाविकास आघाडीचे सर्व महत्त्वाचे नेते आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत आगामी विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराच रणशिंग याच सभेतून महाविकास आघाडी फुकंणार आहे. त्यानंतर २० ऑगस्टला काँग्रेसचे नेते आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत बीकेसीत सभा पार पडणार आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाची शिवनेरीवरून आज पासून शिवस्वराज्य यात्रेची सुरुवात झालेली आहे. तर उद्यापासून काँग्रेस पक्षाचे नेते मराठवाड्याच्या दौऱ्यावरती असून प्रभारी रमेश चन्नीथला हेही उपस्थित असणार आहेत. मराठवाड्यातील जागा वाटपांच्या चाचणीसह प्रचारांच्या छोट्या-मोठ्या सभा पार पडणार आहेत.

### २० ऑगस्टपासून राज्यभरामध्ये संवाद दौरा

तर दुसरीकडे उद्धव ठाकरे हे उद्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातील बालेकिल्लामध्ये मेळावा घेणार आहे. महाविकास आघाडीच्या वतीने १६ ऑगस्ट पासून प्रचार सभेचा नारळ फोडणार आहे आणि थेट वीस तारखेला प्रचारासाठी राहुल गांधी आणि मलिकार्जुन खर्गे मुंबईत येत आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीने चांगलीच कंबर असलेले आहे. याला प्रतिउत्तर देण्यासाठी महायुती सुद्धा २० ऑगस्टपासून राज्यभरामध्ये संवाद दौरा करत आहे....

### काय आहे महायुतीची रणनीती?

प्रचाराची रणनीती ठरवण्यासाठी रात्री उशिरा मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री आणि समन्वय समितीच्या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. २० ऑगस्टला कोल्हापूरमध्ये महालक्ष्मीचे दर्शन घेऊन महायुती संवाद यात्रेला सुरुवात करणार आहेत. महायुतीचे २८८ मतदार संघामध्ये ही संवाद यात्रा होणार आहे. कोल्हापूरमध्ये सुरुवात केलेल्या संवाद यात्रेची सांगता मुंबईमध्ये होणार आहे.

एका दिवसाला दोन किंवा तीन मतदारसंघांमध्ये ही संवाद यात्रा होईल. या संवाद यात्रेचा दौरा कमीत कमी सात दिवस आणि जास्तीत जास्त दहा दिवसांचा असणार आहे. राज्याच्या सातही विभागामध्ये मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या जाहीर सभा होणार आहे.

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा प्रचारात गाजावाजा

महायुतीच्या प्रचारामध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा असेल तो मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण हा असणार आहे आणि याच मुख्यमंत्री लाडके बहीण योजनेच्या पहिला हप्ता १७ ऑगस्टला दिला जाणार आहे. त्यासाठी मुख्यमंत्री दोनही उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत मोठा गाजावाजा करत कार्यक्रम घेतला जाईल आणि त्यावेळी प्रत्येक जिल्ह्यामध्ये पालकमंत्री ही हा कार्यक्रम घेणार आहेत. त्यामुळे ख-या अर्थाने महायुतीच्या प्रचाराला सुरुवात या ठिकाणाहून होणार आहे.

### कोण बाजी मारणार?


महायुती आणि महाविकास आघाडी यांच्या प्रचाराच्या रणनीती ठरलेल्या आपल्याला पाहायला मिळतायेत. मात्र प्रश्न उरलाय तो जागा वाटपांचा आणि प्रचारासोबतच जागा वाटपाला सुद्धा युती आणि महाविकास आघाडीमध्ये सुरुवात झालेली आहे. जागा वाटप करताना अनेक जागांवर तिढा आहे. कारण युती आणि आघाडीत नवीन भिडू पहिल्यांदा सहभागी झालेले आहेत. त्यामुळे जागावाटप करताना दोघांनाही डोकेदुखी तर असणारच आहे मात्र रुसवे फुगवे ही यामध्ये मोठ्या प्रमाणावरती पाहायला मिळणार आहे. यात कोण बाजी मारणार आणि कोण आपल्या पदरात जास्त जागा पाडून घेणार हे पाहणं महत्वाचं राहणार आहे.

## मुख्यमंत्रिपदाच्या हव्यासापोटी ३ दिवस दिल्लीत मुक्काम करणाऱ्या उद्धव ठाकरेंना...; भाजपाची बोचरी टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई**

उद्धव ठाकरे काही दिवस दिल्ली दौऱ्यावर होते. उद्धव बाळासाहेर ठाकरे गटाच्या दिल्ली वारीतून महाराष्ट्राच्या वाट्याला तर सोडाच पण 'उबाठा'च्या हातीही धुपाटणेच आले. मुख्यमंत्रीपदाच्या हव्यासापोटी ३ दिवस दिल्लीत मुक्काम करणाऱ्या उद्धव ठाकरे यांना हुजरेगिरी करूनही हाती कोरडे चिपाडच लागले. तीन दिवस बैठका, भेटी घेऊनही रिकामे हात हलवत परत यावे लागले आहे, अशा खोचक शब्दांत भाजपाचे प्रदेश मुख्य प्रवक्ता केशव उपाध्ये यांनी बोचरी टीका केली.

महाविकास आघाडीच्या बैठका म्हणजे निव्वळ कोरडे चिपाड आहेत, ना चव.. ना रस... ना गोडवा. मुख्यमंत्रिपदाच्या महत्वाकांक्षेपायी उद्धव ठाकरेंनी दिल्लीचे उंबरे झिजवले. पण काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण



यांनी मुख्यमंत्रिपदाचा निर्णय हा निवडणुकीनंतर होणार असून, 'ज्यांच्या जागा जास्त, त्यांचा मुख्यमंत्री' असे सांगून ठाकरे यांची निराशा केली. तसेच जागावाटपातही काँग्रेस मोठा भाऊ असणार, असा स्पष्ट संदेशच दिल्लीवारीतून उद्धव ठाकरे यांना काँग्रेसने दिल्याने उबाठा सेनेने स्वाभिमान गमावला, असे उपाध्ये म्हणाले.

२०१९ मध्ये भाजपाने तुमचा सन्मान राखत तुम्हाला १२५ जागा दिल्या होत्या. आता तुम्हाला १०० जागा मिळवण्यासाठी काँग्रेसच्या दिल्ली तख्तापुढे झुकावे लागते आहे. जागावाटपात १०० जागाही तुम्हाला मिळणार नाहीत, मग तुमच्या दिल्ली दौऱ्यातून नेमके पदरी तरी काय पाडून घेतले? असा खोचक भाजपाने केला.

ठाकरे हे केवळ स्वतःच्या राजकीय हव्यासापोटी दिल्लीला गेले होते. त्यांना महाराष्ट्राच्या आणि जनतेच्या हिताशी काहीही देणे-घेणे नाही हे पुन्हा दिसून आले, असा घणाघातही उपाध्ये यांनी केला.

## लक्षात ठेवा, मी राजकारणातला बाप; प्रकाश आंबेडकरांनी स्पष्ट सांगितलं

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९ नांदेड**

लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात आता विधानसभा निवडणुकीचे वेध लागले आहेत. सर्वच पक्षांकडून विधानसभा निवडणुकीसाठी जोरदार चर्चा सुरु आहे. या निवडणुकीसाठी विविध मतदारसंघात एनडीएसह इंडिया आघाडीच्या नेत्यांकडून चाचपणी सुरु आहे. तर दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीही मागे राहिल्याचं दिसून येत नाही. वंचित बहुजन आघाडीच्यावतीने राज्यभरात आरक्षण बचाव यात्रेच आयोजन करण्यात येत आहे. अशातच आता प्रकाश आंबेडकरांनी एक खळबळजनक विधान केलंय. लक्षात ठेवा मी राजकारणातला बाप आहे, असं विधान आंबेडकरांनी केलंय. ते नांदेडमध्ये बोलत होते. त्यामुळे राजकीय वर्तुळात सर्वांच्याच



भुवया उंचावल्या आहेत.प्रकाश आंबेडकर माध्यमांशी संवाद साधत असतानाच विधानसभा निवडणुकीला वंचित उमेदवार देणार नाही का? असा सवाल माध्यमांकडून विचारण्यात आला. या प्रश्नावर बोलताना आंबेडकर म्हणाले, तुम्हाला हा प्रश्न कोणी विचारण्यास सांगितलं. तुझं जेवढं वय नाही, तेवढी वर्षे पत्रकारितेत माझी गेली आहे, हा प्रश्न इतरांना विचारा, मला नका विचारु कारण मी राजकारणातला बाप आहे हे लक्षात घ्या, असं प्रकाश आंबेडकरांनी स्पष्ट केलंय.

बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना वाजेद या आपल्या पदाचा राजीनामा देऊन बांगलादेशच्या बाहेर पळून गेल्या आहेत. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याची जाणीव झाल्यानंतर त्यांनी भारतात पळून येण्याचा घेतलेला निर्णय योग्यच म्हणावा लागेल. त्यांनी असा निर्णय घेतला नसता तर त्यांची अवस्था त्यांचे वडील शेख मुजिबर रेहमान यांच्याप्रमाणे कदाचित झाली असती. १९७५ साली शेख मुजिबर रेहमान यांची बांगलादेश लष्करातील ज्युनिअर ऑफिसर्सनी हत्या केली होती. त्यावेळी शेख हसीना या जर्मनीत असल्याने त्या हत्याकांडातून वाचल्या होत्या. शेख मुजिब यांच्या संपूर्ण कुटुंबाची त्या वेळेस मारेकऱ्यांनी हत्या केली होती. २००९ पासून गेली १५ वर्षे सत्तेवर असलेल्या शेख हसीना यांनी काळाची पावले वेळीच ओळखली नाहीत हे मात्र खरे आहे. गेल्या पंधरा वर्षांत शेख हसीना यांनी ज्या निवडणुका जिंकल्या तो एक फार्स होता असेच म्हणावे लागेल. प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने या निवडणुकांवर बहिष्कार टाकल्याने निवडणुका एकतर्फीच झाल्या होत्या. २०१८ साली बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या सर्वेसर्वा खलेदा झिया यांची भ्रष्टाचार प्रकरणी जेलमध्ये रवानगी झाल्यानंतर विरोधी पक्ष आणखीनच कमकुवत झाले होते. आता त्यांच्या सुटकेचे आदेश देण्यात आले आहेत. गेल्या १५ वर्षांत बांगलादेशमध्ये एकंदरीत स्थिरता असली तरी सुप्त अशांतता होती. काही वेळा ती बाहेरही आली होती.

सुरुवातीला शेख हसीना यांची अर्थ व्यवस्थेवर चांगली पकड होती. त्यामुळे

## संपादकीय ......

# हसीनांनी वेळीच देश सोडला

पाकिस्तानसारखी कंगाल होण्याची वेळ बांगलादेशवर आली नाही. मात्र गेल्या काही काळात हसिना यांची अर्थव्यवस्थेवरील पकड ढिली झाल्याचे दिसून आले आहे. गार्मेंट व्यवसाय हा बांगलादेशमधील सर्वात मोठा उद्योग आहे. विदेशी चलनाबरोबरच या उद्योगाने लाखो बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे; परंतु गेली काही वर्षे हा उद्योग निरनिराळ्या कारणांमुळे संकटात सापडला आहे. त्यामुळे बेरोजगारांची संख्या वाढत चालली आहे. त्यातच बांगलादेशमध्ये सरकारी नोकऱ्यांत ५६ टक्के आरक्षण होते त्यामुळे बेरोजगारांमध्ये कमालीचा असंतोष होता. सरकारी नोकरीत असलेला आकर्षक पगार आणि इतर भत्ते यामुळे सर्व बेरोजगारांच्या नजरा सरकारी नोकरीवर असणे स्वाभाविकच होते; परंतु केवळ ४४ टक्के नोकऱ्या आरक्षणमुक्त असल्याने बेरोजगारांमध्ये प्रचंड नाराजी होती. त्या विरोधात या पूर्वीही आंदोलने झाली होती; परंतु ती आंदोलने इतकी तीव्र नव्हती.

पूर्वीच्या ५६ टक्के आरक्षणात ३० टक्के जागा बांगलादेश स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांकरिता आणि नातवंडांकरिता आरक्षित होत्या. १० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित होत्या. १० टक्के जागा मागास जिल्ह्यांतील लोकांसाठी आरक्षित होत्या. ५ टक्के जागा अल्पसंख्य समाजासाठी आरक्षित होत्या. १ टक्का जागा अपंगांसाठी आरक्षित होत्या.

या असंतोषाची मोठी ठिणगी जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पडली. ढाका युनिव्हर्सिटी आणि इतर युनिव्हर्सिटींमधील विद्यार्थी आरक्षणाच्या विरोधात रस्त्यावर उतरले. तोपर्यंत वेळ गेलेली नव्हती. हसिना यांच्या नेतृत्वाखालील सरकारला त्यांच्याशी वाटाघाटी करता आल्या असत्या; परंतु सरकारने ती गोष्ट गंभीरपणे घेतली नाही. मग ठिणगीचे रूपांतर वणव्यात झाले. हसिना सरकारने ते आंदोलन बंदुकीच्या जोरावर दडपण्याचा प्रयत्न केला. त्याची परिणीती आंदोलन चिघळण्यात झाली. हसिना यांचे वडील शेख मुजीबर रेहमान यांनी अशाच प्रकारची चूक ते बांगलादेशमध्ये सत्तेवर आल्यानंतर केली होती. वृत्तपत्रांवर बंधने घातली होती. एक पक्ष आणि एक नेता अशी परिस्थिती त्यांनी निर्माण केली होती. अति विश्वास ठेवल्यामुळे जनतेमधील असंतोष त्यांच्यापर्यंत पोहोचलाच नाही. त्याची परिणती त्यांच्या हत्येत झाली. या सर्व घडामोडींचा विस्तृत आढावा शेख मुजीबर रेहमान ते शेख हसीना वाजेद, या पुस्तकात घेतला आहे.

आपल्या वडिलांच्या उदाहरणावरून योग्य तो धडा हसिना यांनी घेतला नाही असेच आता म्हणावे लागेल. विद्यार्थ्यांच्या आणि सामान्य माणसांच्या आंदोलनात २०० च्या वर लोक मारले गेले. ९०० च्या वर लोक जखमी झाले. हे आकडे बिघडलेल्या परिस्थितीचे द्योतक आहेत. आंदोलकांवर हेलिकॉप्टरच्या माध्यमातून गोळ्या झाडण्यात आल्या, टिअर गॅस सोडण्यात आले. असे निर्घृण प्रकार आपल्या जनतेविरोधात नव्हे तर शत्रूच्या विरोधात, अतिरेक्यांच्या विरोधात केले जातात. आंदोलन करणाऱ्यांशी वाटाघाटी करण्याऐवजी त्यांच्याविरोधात पोलीस आणि इतर सुरक्षा दलांचा हडेलहप्पी वापर करणे, अवामी लीगच्या विद्यार्थी संघटनेच्या कार्यकर्त्यांना आंदोलकांच्या अंगावर सोडणे हे प्रकार आंदोलन चिघळवणारे होते. बांगलादेश सुप्रीम कोर्टाने त्यामध्ये हस्तक्षेप करून आरक्षणाची तरतूद ७ टक्क्यांपर्यंत खाली आणली. सुप्रीम कोर्टाने ९३ टक्के जागा गुणवत्तेवर भरण्याचा निकाल दिला. आरक्षित ७ टक्क्यांमध्ये ५ टक्के स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांसाठी, १ टक्का आदिवासींसाठी आणि १ टक्का जागा अपंगांसाठी राखीव ठेवण्यात आल्याचा निकाल सुप्रीम कोर्टाने दिला; परंतु तोपर्यंत वेळ निघून गेली होती.

रझाकार म्हणजे बांगलादेश स्वातंत्र्य आंदोलनात ज्यांनी पाकिस्तानी सैनिकांना मदत केली ते देशद्रोही लोक होत. हसिना देशातून बाहेर पळून गेल्या, आता पुढे काय? आता नजीकच्या काळात बांगलादेशमध्ये शांतता प्रस्थापित होणे कठीण आहे. आता सत्ताधारी अवामी लीगच्या कार्यकर्त्यांवर हल्ले केले जातील. बांगलादेशचे निर्माते शेख मुजिबर रेहमान यांचा पुतळा पाडून आंदोलकांनी पुढील दिशा निश्चित केली आहे. हसिना या सत्तेतून बाहेर होणे ही गोष्ट भारतासाठी चांगली नाही. त्या पंतप्रधान असताना भारताचे बांगलादेश बरोबरील संबंध कधी नव्हे इतके चांगले होते. बघू या पुढे काय घडते ते.




# डेंग्यू झाल्यास जरूर खा ही ४ फळे, प्लेटलेट्स काऊंट वाढेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

डेंग्यू झाल्यास सगळ्यात गरजेचे आहे ते म्हणजे खाण्यापिण्यावर लक्ष देणे. लवकर बरे होण्यासाठी तुम्हाला तुमच्या डाएटमध्ये व्हिटामिन सीने भरपूर असलेली फळे आणि भाज्यांचा समावेश करायला हवा.



दिवसभर शरीराला हायड्रेट राखणे गरजेचे असते. जाणून घ्या डेंग्यू झाल्यास कोणती फळे खायला हवीत?

डेंग्यूचा ताप हा धोकादायक मानला जातो. डेंग्यू झाल्यास शरीरातील प्लेटलेट्स कमी होऊ लागतात. यामुळे अशक्तपणा येतो. सातत्याने उलटी, ताप तसेच डोकेदुखी होते. यामुळे संपूर्ण शरीराची हालत बिघडते.

डेंग्यू लवकर बरा होण्यासाठी खाण्या-पिण्याकडे खास लक्ष दिले पाहिजे. डाएटमध्ये व्हिटामिन सी असलेल्या फळांचा समावेश करावा. जितके शक्य असेल तितके पाणी प्या. शरीराला हायड्रेट ठेवा. यामुळे डेंग्यू लवकर बरा होण्यास मदत मिळते.

किवी - डेंग्यूच्या रुग्णांना किवी खाण्याचा सल्ला दिला जातो. किवीमध्ये व्हिटामिन सी असते जे शरीराला रोगप्रतिकारक शक्ती प्रदान करते. किवीमुळे प्लेटलेट्स वाढण्यास मदत होते.

डाळिंब - डेंग्यूचे रुग्ण डाळिंब खाऊ शकतात. डाळिंबामध्ये अँटीऑक्सिडंट आढळतात. यात व्हिटामिन सीही असते. डाळिंब खाल्ल्याने लाल रक्तपेशी वाढतात. डाळिंब खाल्ल्याने थकवा आणि अशक्तपणा दूर होतो.

पपई - फायबरने भरपूर असलेला पपई डेंग्यूच्या रुग्णांसाठी अतिशय फायदेशीर आहे. यात व्हिटामिन सी आणि व्हिटामिन ए असते. डेंग्यूचा ताप आल्यास पपईच्या पानांचा रस दिला जातो. यामुळे प्लेटलेट्स वाढतात.

सफरचंद - डेंग्यू असो वा कोणताही ताप, सफरचंद हे असे फळ आहे जे तुम्ही सहज खाऊ शकता. सफरचंदामध्ये गरजेचे व्हिटामिन आणि मिनरल्स असतात. यामुळे ताप लवकर बरा होण्यास मदत होते.

# हळदीच्या पानांवर पिवळेपणा वाढलाय? मग करा हे सोपे उपाय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** - काही ठिकाणी हळद पिकाची पाने पिवळी पडत आहेत. जर पिवळेपणा वाढत गेल्यास हळदीचे पान हरितद्रव्य (अन्न) तयार करू शकणार नाही. त्यामुळे उत्पादनात घट होऊन हळदीची प्रत अथवा गुणवत्ता घटक जसे रंग, कुरकुमीनचे प्रमाण आदी बाबींवर देखील परिणाम होतो.

हळद पीक पिवळे पडण्याची नेमकी कारणे शोधून त्यावर योग्य उपाय करणे गरजेचे आहे. एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन तसेच एकात्मिक रोग कीड व्यवस्थापन होणे गरजेचे आहे. हळद पिकाचे शेंड्याकडील पाने पिवळी पडून वाढ खुंटते. परिणामी हळद

विदर्भ प्रजासत्ताक
कृषी विशेष

पिकाच्या पानांवर कायमस्वरूपी पिवळसरपणा दिसून येतो.

जमिनीमध्ये मातीच्या कणांची रचना बिघडल्यामुळे जमिनीची घनता वाढते म्हणजेच जमिनी घट्ट बनतात. अशा जमिनीत हवा, पाणी खेळण्याचे प्रमाण अत्यल्प असते. जमिनीमध्ये नत्र, मग्नेशिअम आणि लोहाच्या कमतरतेमुळे हळद पिकांची पाने पिवळी पडतात.

सततच्या पावसामुळे शेतातील अति ओलाव्याने पाने पिवळी पडतात. त्यासाठी शेतात पावसाचे पाणी जास्त दिवस साचू देऊ नये. यासाठी योग्य निचरा प्रणालीचा अवलंब करून अतिरिक्त पाणी शेतातून काढून देणे गरजेचे आहे.

### अन्नद्रव्याची कमतरता

लागवडीपासून ते काढणीपर्यंत वाणपरत्वे हळद पीक नऊ महिने शेतात राहते. हळद पिकाच्या उत्पन्नाचा स्रोत जमिनीत वाढणारे गड्डे (कंद) असल्यामुळे बऱ्याच शेतकरी बांधवांचा असा गैरसमज असतो की नत्रयुक्त खते जसे युरिया दिल्यास हळदीचे गड्डे खराब होतील. त्यामुळे हळद पिकास शिफारशीत, मात्रेत नत्रयुक्त खते मिळत नाहीत. जमिनीतील




अन्नद्रव्ये जसे नत्र, मग्नेशिअम आणि लोह यांची कमतरता भासल्याने ही पाने पिवळी पडतात. नत्राच्या कमतरतेमुळे पाने लहान व फिक्कट हिरवी होतात. कधी कधी सरसकट पाने पिवळी दिसतात.

### रोग किडींचा प्रादुर्भाव

रोग आणि किडींच्या प्रादुर्भावामुळे हळदीची पाने पिवळी पडतात. करपा रोगामुळेसुद्धा पाने पिवळी पडतात. मात्र करपा रोगात पाने पिवळी पडून पानांवर तपकिरी रंगाचे ठिपके प्रथमतः खालच्या पानांवर पडतात.

### उपाययोजना

**सुयोग्य जमिनीची निवड**

१ हळद पिकाचा उत्पन्नाचा स्रोत जमिनीत वाढणारे गड्डे (कंद) असल्यामुळे हळद लागवडीसाठी मध्यम प्रतीची, भुसभुशीत व पाण्याचा चांगला निचरा होणारी, सेंद्रिय कर्बाचे जास्त प्रमाण असलेली जमीन निवडावी. जमिनीत गरजेपुरता सतत वाफसा असणे गरजेचे आहे.

१ भारी काळ्या जमिनीमध्ये अतिवृष्टी होऊन शेतात पाणी साचले असल्यास चर खोदून पाणी उताराच्या दिशेने शेता बाहेर काढावे. कॉपर ऑक्सिक्लोराईड २ ग्रॅम प्रती लिटर पाणी याप्रमाणे आळवणी किवा फवारणी करावी.

१ हळद लागवडीपूर्वी हळद बेण्यास जैविक (जीवाणूजन्य खतांची) बीजप्रक्रिया करावी. अझोस्पिरीलीम स्फुरद विरघळणारे जीवाणू प्रत्येकी १० ग्रॅम व्हाम २५ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात घेऊन त्यामध्ये हळद बेने १० ते १५ मिनिटे बुडवून लगेच लागवडीसाठी वापरावे. ही जीवाणूजन्य खते जमिनीद्वारे दिलेली रासायनिक खते हळद पिकाला सहज उपलब्ध करून देण्यास मदत करतात.

**अन्नद्रव्यांचे सुयोग्य नियोजन-** १ नत्राची कमतरता असल्यास युरिया २ टक्के (२० ग्रॅम प्रती लिटर पाणी) याप्रमाणे पानांवर फवारणी करावी. रासायनिक खतांचा वापर करताना नत्र अमोनिअम सल्फेटद्वारे, स्फुरद डाय अमोनिअम फॉस्फेटद्वारे आणि पालाश सल्फेट ऑफ पोटॅश द्वारे हळद पिकाला दिल्यास खतांची आणि पर्यायाने अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढते, रासायनिक खते जमिनीच्या पृष्ठभागावर फेकून देऊ नयेत, ती जमिनीत पेरून मातीत मिसळून द्यावीत. हळद पिकांची पाने लोहाच्या कमतरतेमुळे पिवळी पडल्यास पानांवर ५० ग्रॅम फेरस अमोनिअम सल्फेट अथवा फेरस सल्फेटची १० लिटर पाण्यातून ३ ते ४ वेळा फवारणी करावी. फवारणीसाठी लागणारी सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते चिलेटेड स्वरूपात असल्यास उपलब्धता वाढते. फवारणी करताना जमिनीत ओलावा असणे गरजेचे असते. चिलेटेड सूक्ष्म अन्नद्रव्यांचे फवारणी करावी.

**- डॉ. मनोज माळी**
प्रभारी अधिकारी, हळद संशोधन योजना, कसबे डिग्रज

# कोणत्या फळपिकाला किती पाणी द्यायचे हे कसे ठरविले जाते?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** - फलोद्यान पिकांची प्रामुख्याने फळबाग, फूलशेती, कंदपिके, मसाल्याची पिके, चहा, कॉफी व इतर दुय्यम पिके, आदी शाखांमध्ये विभागणी केली जाते. याशिवाय पाण्याच्या आवश्यकतेनुसार विविध फळझाडांची मुख्यत्वे तीन प्रकारांत विभागणी होते.


एक म्हणजे कोरडवाहू अथवा वर्षावलंबी फळझाडे (सर्वस्वी पावसाच्या पाण्यावर घेतली जाणारी फळझाडे) प्रामुख्याने आंबा, काजू, फणस, कोकम, जांभूळ, आवळा, करवंद, चिच, सीताफळ, कवठ, इत्यादी झाडांचा समावेश होतो.

कमी अथवा मर्यादित सिंचनावर घेतल्या जाणाऱ्या फळझाडांमध्ये डाळिंब, बोर, अंजीर, लिंबू, अननस, पपनस ही झाडे आहेत. भरपूर व नियमित पाण्यावर घेतल्या जाणाऱ्या फळझाडांमध्ये केळी, नारळ, सुपारी, चिकू, द्राक्षे, पेरू, पपई, लिची, स्ट्रॉबेरी, संत्री, मोसंबी व मसाल्याच्या पिकांचा समावेश होतो.

आंबा, काजू, फणस, कोकम ही कोकण विभागातील वर्षावलंबी फळझाडे असली तरी लागवडीच्या सुरुवातीच्या ३ ते ४ वर्षापर्यंत त्यांना जगवण्यासाठी पाणी आवश्यक असते.

नारळ, सुपारी ही महत्त्वाची नगदी पिके आहेत. या पिकांच्या वाढीसाठी व उत्पादनासाठी पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीची तसेच मुबलक पाण्याची आवश्यकता असते.

शिवाय चिकू, केळी,




पानवेल, अननस व मसाल्यांची पिके (काळी मिरी, कोको, लवंग, दालचिनी) हीदेखील येथील महत्त्वाची बागायती पिके आहेत; परंतु बहुतांश शेतकरी नारळ, सुपारी, केळी, पानवेल, मसाल्यांच्या पिकांची मिश्रपीक पद्धतीने लागवड करतात.

अन्नधान्य व इतर नगदी पिकांप्रमाणेच बागायती फळपिकांना पाणी देण्यासाठी विविध सिंचन पद्धतींचा अवलंब करण्यात येतो.

योग्य अशा सिंचन पद्धतींची निवड करताना मुख्यत्वेकरून, जमिनीचा प्रकार, खोली, उतार, पोत व इतर भौगोलिक गुणधर्म, हवामान व हंगाम, पिकांविषयक माहिती, झाडाचे वय, मुळांची खोली, प्रकार, रचना, दोन ओळींतील व झाडांतील अंतर, फलधारणेचा कालावधी, पाण्याची उपलब्धता, पाणी साठविण्याचे व पुरवठा करण्याचे साधन या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

फलोत्पादन पिकांच्या वाढीच्या निरनिराळ्या अवस्थांनुसार पाणी देण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब केला जातो. काही बागायतींमध्ये प्रवाही, तुषार पद्धतीने पाणी देता येते. पुरेसा व नियमित पाणीपुरवठा करणे महत्त्वाचे आहे.

### दीर्घ मुदतीच्या बागा

आंबा, चिकू, नारळ, सुपारी व पानवेलीच्या पिकांना पाणी देण्यासाठी प्रवाही व ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करावा. आंबा कलमे जगविण्यासाठी व त्यांची चांगली वाढ होण्यासाठी लागवडीनंतर पहिली तीन वर्षे हिवाळ्यात आठवड्यातून एकवेळ पाणी देणे आवश्यक असते. प्रतिझाडाला त्याच्या वयानुसार, जमिनीनुसार २० ते २५ लिटर पाणी द्यावे. आंबा कलमे मोहरल्यावर पाणी दिल्यास गळ होत नाही.

# जिल्ह्याभरात नागपंचमी उत्साहात साजरी लाह्या, फुटाणे, नारळांनी सजली बाजारपेठ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती -** श्रावण महिन्यातील पहिला सण म्हणून शुद्ध पंचमीला (दि.९) जिल्ह्यात आज घरोघरी नागपंचमी साजरी करण्यात आली. यानिमित्त पूर्वसंध्येला बाजारपेठ सजली होती. बाजारात पूजेसाठी नागाचे चित्र, लाह्या, फुटाणे, नारळ, बेलाची पाने, केळी, फळे व फुलांची खरेदी करण्यासाठी गर्दी झाली होती. प्रतिकात्मक नागाची पूजा करून नागदेवतेला प्रसन्न करणे हा यामागील उद्देश असतो.

नागपंचमीला चांदी, पितळाचे नाग किंवा नागाच्या चित्राची पूजा करण्याची पद्धत असून, या दिवशी कढई भाजण्याला मान आहे. कढईत ख्याचा हलवा तयार करून कढईसह तो देवापुढे ठेवला जातो. त्याची पूजा करून प्रसाद अर्पण केला जातो. हा प्रसाद लाह्या, फुटाणे व ओल्या नारळासह भाविकांना वितरित करण्याची पद्धत आहे. बहुतेक जण घरीच नागपंचमीची पूजा करतात. तर ज्या ठिकाणी नागाचे मंदिर असेल तेथे जाऊन



पूजा केली जाते. नागपंचमीला घर, अंगण झाडून, पुसून त्यावर लाह्या, फुटाणे टाकले जातात. विधिवत पूजा मांडून मग नागाचे पूजन केले जाते. नागाचा फोटो किंवा धातूच्या नागापुढे दुधाची वाटी ठेवली जाते. त्याचप्रमाणे फळ, नारळ, बिल्वपत्र अर्पण केली



जातात. काहींच्या घरी फुलोरा अर्पण करण्याची परंपरा आहे. यानुसार करंज्या, पात्या, वेण्या, फण्या, मोदकाचा फुलोरा अर्पण केला जातो. हिंदू धर्मात नागदेवतेला विशेष महत्त्व आहे. नागपंचमीच्या दिवशी शेतात सुख, समृद्धी आणि पिकांच्या रक्षणासाठी नागांची पूजा करून त्यांना प्रसन्न केले जाते. नाग हा शिवशंकराच्या गळ्यातील अलंकार आहे आणि भगवान विष्णूची शब्या देखील आहे. नागपंचमीच्या दिवशी नागदेवतेसह भगवान शंकराची पूजा केली जाते.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ९ ऑगस्ट २०२४ — शहर/ग्रामिण


# ‘दर्यापूर शेतकरी सह. जिनिंग अँड प्रेसिंग’ जागेच्या लिलावावेळी वाद

## मनसे कार्यकर्ते- संचालकांत शाब्दिक चकमक; खुर्च्या भिरकावल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९दर्यापूर-** दर्यापूर शेतकरी सहकारी जिनिंग अँड प्रेसिंग फॅक्टरीच्या चार एकरावर असलेल्या खुल्या जागेच्या लिलावाची प्रक्रिया गुरुवारी (दि. ८) दुपारी ४ वाजता सुरू होती. प्रक्रिया सुरू होताच मनसेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व संस्थेच्या उपस्थित संचालकांमध्ये जोरदार वाद झाला. या वेळी एकमेकांच्या दिशेने खुर्च्या भिरकावण्यात आल्या. या प्रकारामुळे काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे ही लिलाव प्रक्रिया तहकूब केल्याची घोषणा संस्थेचे संचालक मनीष कोरपे यांनी केली.



जागेची लिलाव प्रक्रिया दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शेतकरी भवनात आयोजित केली होती. या लिलाव प्रक्रियेला अनेक इच्छुक उपस्थित होते. बोली बोलणाऱ्यांनी २० हजार रुपये अनामत रक्कम भरून प्रक्रियेत सहभाग घेतला होता. मात्र प्रक्रिया सुरू होताच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष मनोज पाटील तायडे, पंकज कदम व प्रवीण कावरे हे शेतकरी भवनात दाखल झाले व आक्रमकपणे विरोध करत त्यांनी हल्लाबोल केला. या वेळी मनोज तायडे व संस्थेचे उपस्थित संचालक मनीष कोरपे, महेंद्र भांडे यांनी एकमेकांच्या दिशेने खुर्च्या भिरकावल्या. भाग-भांडवलदारांना कुठलीही माहिती नसल्याचा आरोप करत दर्यापूर शेतकरी सहकारी जिनिंग अँड प्रेसिंग फॅक्टरी जागेचा नियोजित लिलाव रद्द करण्याबाबत मनसेचे तालुका ध्यक्ष मनोज पाटील तायडे यांनी दोन दिवसांपूर्वी सहायक निबंधक किशोर बलिंगे यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती. तसेच या जागेचा लिलाव होऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका तायडे यांनी घेतली होती. दरम्यान गुरुवारी शेतकरी सहकारी जिनिंग संस्थेच्या विद्यमान १३ संचालकां पैकी दोन संचालकांनी हजर राहून लिलावाला सुरुवात केली. त्यानंतर मनसेने आक्रमक होत लिलाव सुरू होताच लिलाव प्रक्रिया उधळून लावली. दरम्यान तहकूब झालेला जागा लिलाव पुढे कधी होणार, याकडे सर्वांचे लक्ष आहे. लिलावाच्या विरोधात तीन संचालक : एकेकाळी दर्यापूर तालुक्यातील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य संस्था म्हणून प्रसिद्ध असलेली दर्यापूर शेतकरी सह. जिनिंग अँड प्रेसिंग फॅक्टरीचा लिलाव रद्द करा, अशी मागणी संस्थेला व सहायक निबंधक यांच्याकडे गुरुवारी दुपारी विद्यमान संचालक नरेश देशमुख, सुनील बोंडे, अनुराग खेडकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनानुसार, या संस्थेने लिलावाकरिता सहायक निबंधक, सहकारी संस्था दर्यापूर यांच्याकडून अटी व शर्तींची पूर्तता न करता रितसर परवानगी घेतलेली नाही.

तसेच वरील व्यवहारासाठी संस्थेच्या भागधारकांची विशेष आमसभा बोलवावी. या बाबीची पूर्तता न केल्यामुळे ८ ऑगस्टचा लिलाव रद्द करावा, अशी मागणी या तीन संचालकांनी केली होती.बोली बोलणाऱ्या इच्छुकांनी प्रत्येकी २० हजार रुपयेप्रमाणे अनामत रक्कम भरली होती. दरम्यान लिलाव प्रक्रियेवेळी घडलेला वाद व लिलावाची प्रक्रिया तहकूब झाल्याचे जाहीर होताच इच्छुकांनी भरलेली अनामत रक्कम परत करण्यात आली आहे.

> संचालक मंडळाच्या निर्णयावरूनच रितसर लिलाव प्रक्रिया आयोजित केली होती. अध्यक्षांच्या सूचनेवरून मी लिलाव प्रक्रियेस उपस्थित होतो. संस्थेचे सभासद नसताना काही जणांनी विनाकारण येऊन लिलाव प्रक्रियेत अडथळा आणला. आम्हाला प्रकरण वाढवायचे नव्हते म्हणून लिलाव प्रक्रिया तहकूब केली. लिलावासंबंधी पुढील निर्णय संस्था पदाधिकारी घेतील. त्यानंतर लिलाव होईल. – **मनीष कोरपे,** संचालक.

# नीरजला रौप्य!

## पाकिस्तानच्या नदीमनं ऑलिम्पिक रेकॉर्डसह कमावलं गोल्ड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ पॅरिस-** पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत भारताचा



गोल्डन बॉय नीरज चोप्रा याच्या कामगिरीकडे सर्वांच्या नजरा लागून होत्या. १४० कोटी भारतवासीयांच्या अपेक्षांचे ओझे घेऊन आर्मी मॅन नीरज चोप्रा भालाफेक करण्यासाठी मैदानात उतरला होता. मैदानी क्रीडा प्रकारात भारतासाठी पहिलं गोल्ड मिळवून देणाऱ्या नीरज चोप्रा यंदाच्या स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा सुवर्ण कामगिरी करून दाखवेल, अशी आशा तमाम भारतीयांना होती. पण यावेळी त्याला रौप्य पदकावरच समाधान मानावे लागले.

नीरज चोप्रा पहिल्या प्रयत्नात अपयशी ठरला होता. पण दुसऱ्या प्रयत्नात त्याने ९०.४५ मीटर भाला फेकत हंगामातील सर्वोत्तम कामगिरीची नोंद केली. त्याची हे कामगिरी पदक पक्के करण्यासाठी पुरेशी ठरली. दुसरीकडे नीरज चोप्राच्या आधी पाकिस्तानच्या अर्शद नदीम याने पहिला प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर दुसऱ्या प्रयत्नात ९२.९७ मीटर अंतरावर भाला फेकत ऑलिम्पिक स्पर्धेत नवा विक्रम प्रस्थापित केल्याचे पाहायला मिळाले. यासह त्याने गोल्ड मेडलही पक्के केले. ग्रेनाडच्या अँडरसन पीटरसन याने ८८.५ मीटर या कामगिरीसह कांस्य पदकावर नाव कोरलं.

### भारताच्या खात्यात पहिलं रौप्य

नीरज चोप्राचं सुवर्ण पदक हुकले असले तरी दुसऱ्या स्थानावर राहून गोल्डन बॉयनं खास विक्रम आपल्या नावे केले आहे. यंदाच्या स्पर्धेतील भारताच्या खात्यात जमा झालेले हे पहिलं रौप्य पदक ठरलं. स्वातंत्र्यानंतर मैदानी खेळात दोन वेगवेगळ्या ऑलिम्पिक स्पर्धेत सोनेरी क्षणाची अनुभूती दिल्यानंतर चंदेरी कामगिरी करणारा तो एकमेव खेळाडू आहे. याशिवाय वेगवेगळ्या ऑलिम्पिक स्पर्धेत सुशील कुमार याच्यानंतर ऑलिम्पिकमध्ये दोन पदकं जिंकणारा तो दुसरा खेळाडू ठरला आहे.

### पाकिस्तानला वैयक्तिक तिसरे पदक, तेही गोल्ड

१९६० मध्ये रोममध्ये झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत मोहम्मद बशीर यांनी कुस्तीमध्ये ७३ किलो वजनी गटात कांस्य पदकाची कमाई केली होती. याशिवाय १९८६ मध्ये हुसैन शाह या खेळाडूनं बॉक्सिंगमध्ये पाकिस्तानला कांस्य पदकाची कमाई करून दिली होती. या दोन खेळाडूंनतर नदीम हा पाकिस्तानला पदक जिंकून देणारा केवळ तिसरा खेळाडू ठरला.

# नया अकोला चांदूरबाजार महामार्गावर भीषण अपघात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९दर्यापूर –** नया अकोला चांदूरबाजार महामार्गांवर भीषण अपघात बोलेरो पिकप चक ३० इऊ७०३९ हि गाडी बुलढाणा वरून हिरवी मिर्ची गाडीत घेऊन चांदूरबाजार येथील बाजार समितीत विकायला घेऊन जात असताना अचानक नया अकोला गावाजवळ गाडीचा टायर फुटल्याने गाडी निंबाच्या झाडावर आदळली गाडीचा चालक आणि वाहक हे दोघेही गंभीर जखमी झाले आहेत त्यांना अमरावती येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे गाडी महामार्गाच्या मधात असल्यामुळे एक तास वाहतूक जाम झाली होती मात्र गावकऱ्यांच्या मदतीने ट्रॅक्टरच्या सहाय्याने गाडीला बाजूला घेऊन वाहतूक सुरळीत करण्यात आली हि घटना गुरुवारी रात्री ११ च्या सुमारास घडली आहे

वलगाव पोलिसांना माहिती मिळताच ते तात्काळ घटनास्थळी पोहोचले.



बोलेरो पिकप गाडीचा टायर फुटल्याने गाडी आदळली निबांच्या झाडावर

# स्वातंत्र्य दिन सहा दिवसांवर गणवेश शिवून मिळेना!

## कापड आले, पण कापून मिळालेच नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती :** राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या एक राज्य एक गणवेश’ योजनेंतर्गत यावर्षी राज्यातील वर्ग पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्यात येणार आहे. जिल्ह्यात शालेय गणवेश हा महिला आर्थिक विकास महामंडळाकडून पुरविला जाणार आहे. दुसरीकडे स्काउट-गाईड गणवेशाचे कापड प्राप्त झाला असला तरी प्रत्येक विद्यार्थ्याला मापानुसार कटाई करण्यात आली नसल्याने हा कापड तालुकास्तरावर पडून आहे. त्यामुळे शैक्षणिक सत्र सुरू होऊन अद्यापही एकाही विद्यार्थ्याला गणवेश मिळू शकला नाही. १५ ऑगस्टपूर्वी हे गणवेश मिळणार नसल्याने विद्यार्थ्यांना जुन्याच गणवेशात स्वातंत्र्य दिन साजरा करावा लागण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित असणाऱ्या शाळांमधील वर्ग पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांकरिता या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने जून महिन्यात शासन निर्णय काढला.जिल्ह्यातील शाळा १ जुलैपासून सुरू झाल्या. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश मिळणे अपेक्षित होते. परंतु, शालेय शिक्षण विभागाच्या नियोजनशून्य कारभारामुळे महिनाभराचा कालावधी लोटूनही गणवेशाचे साधे कापड सुद्धा कापून झाले नाही. त्यामुळे शिक्षकांची डोकेदुखी वाढली आहे.जिल्ह्यात या योजनेत पात्र विद्यार्थ्यांची संख्या १ लाख २० हजारांवर आहे. या विद्यार्थ्यांसाठी गणवेशाच्या कापडाचे मोठे गठ्ठे संबंधित पंचायत समिती कार्यालयाला प्राप्त झाले आहेत. मात्र, कापड पुरवठादार यांच्याकडून वर्गनिहाय कापड कापण्याची कारवाई अद्यापही प्रलंबित आहे.

### शिक्षण विभाग अडचणीत

शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश देण्यासाठी विद्यार्थ्यांचे माप घेणे गरजेचे आहे. त्यामुळे कोणत्या शाळेला किती मीटर गणवेशाचे कापड द्यायचे, हेच ठरलेले नसल्याने शिक्षण विभाग अडचणीत आला आहे.


**कोणत्या शाळेला किती मीटर गणवेशाचे कापड द्यायचे, हेच ठरेना !**



# तुळजापूर जहागिरचे बारा दिव्यांग भत्त्यापासून वंचित, दिव्यांगांच्या हितासाठी निधीची तरतूद करणे बंधनकारक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९परतवाडा-** राज्य शासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेला दिव्यांगाच्या हितासाठी ३ टक्के निधी खर्च करावा लागतो. हा निधी वितरीत करताना अचलपूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या तुळजापूर जहागिर येथील ग्रामसेवकाच्या उदासिन कारभारामुळे १२ दिव्यांगांना प्रोत्साहन भत्त्यासाठी हेलपाटे मारावे लागत आहे. त्यामुळे दिव्यांगांनी संताप व्यक्त केला आहे.ग्रामपंचायतीला दिव्यांगांना आधार देण्यासाठी ३ टक्के निधीतून विविध योजना, आर्थिक लाभ देण्याची तरतूद असते. इतर योजनेतील निधी खर्च करण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाची प्राथमिकता असते. मात्र, दिव्यांगांना लाभ देण्यासाठी दिरंगाई केली जाते. तुळजापूर जहागिर ग्रामपंचायतीने ३ टक्के निधीतून प्रोत्साहनपर भत्ता अदा करण्याकरिता दि अमरावती को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अचलपूर शाखेला १२ लाभार्थींच्या खात्यात थेट रक्कम वळती करण्यासाठी गेल्या एप्रिल महिन्यात ७ हजार २०० रुपयांचा धनादेश आरटीजीएसकरिता दिला होता. जेणेकरून दिव्यांगाच्या खात्यात ही रक्कम जमा होईल.




याबाबत ग्रामसेवक राजेश इंगळे यांनी दिव्यांगाच्या खात्यात ही रक्कम जमा झाली किंवा नाही, याबाबत शहानिशा करत ग्रामपंचायत खात्यातून ही रक्कम विड्रॉल झाली की नाही याची नोंद घेणेही गरजेचे होते. मात्र, याकडे दुर्लक्ष करण्यात आले. चार महिन्यांपूर्वी दिलेला धनादेश बँक प्रशासनाने विड्रॉल न केल्यामुळे या ग्रा. पं.तील दिव्यांग लाभार्थी नीलेश माहुलकर, दादाराव डवरे, प्रशांत ढेपे, विकास माहुलकर, निखिल बेलोरकर, गजानन भगत, पुरुषोत्तम आवारे, गणेश भिंगारे, सुरेंद्र हरणे, विशाल छापानी, विलास इंगळे, माया छापानी यांच्या खात्यात जाणारी प्रत्येकी ६०० रुपयांची रक्कम जमा झाली नाही. चार महिने उलटले तरी ग्रामपंचायत प्रशासनाने संबंधित बँकेलाही याबाबत विचारणा केली नाही.

त्यामुळे हे दिव्यांग अजूनही या प्रोत्साहन अनुदानापासून वंचित असून, त्याबाबत त्यांनी संताप व्यक्त केला आहे. निधीसाठी बँकेला दि लेला धनादेश. ग्रामसेवकावर कारवाई करणे अपेक्षित आहे तुळजापूर जहागिर येथील ग्रामसेवक राजेश इंगळे ग्रामपंचायतीत फारसे उपस्थित राहत नाही. गावातील १२ दिव्यांग प्रोत्साहित भत्त्यापासून वंचित आहेत. चार महिन्यांपूर्वी दिलेला धनादेश का वठला नाही, याची सुद्धा त्यांना माहिती नाही. त्यांच्यावर योग्य ती कारवाई प्रशासनाने करावी. -गजानन भगत, दिव्यांग, सुरवाडा. दिव्यांग हिताला प्राधान्य; तत्काळ कारवाई करणार तुळजापूर जहागिर ग्रामपंचायत नेहमी दिव्यांग हिताला प्राधान्य देत आहे.

> दिव्यांगाच्या हितासाठी आम्ही नेहमी अग्रणी असतो. ग्रामपंचायतकडून नेमकी दिरंगाई का झाली याबाबत चौकशी करून दिव्यांगांना दिला जाणारा निधी तत्काळ त्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी योग्य ती कारवाई करू. – **ज्ञानेश्वर ढेपे,** सरपंच,

### तुळजापूर ज. बँकेत आरटीजीएससाठी धनादेश दिला

तुळजापूर जहागिर येथील दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी ६०० रुपये प्रोत्साहन भत्ता दिला जातो. एकूण ७ हजार २०० रुपयांचा धनादेश त्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी बँकेत देण्यात आला होता. अनुदान जमा झाले नाही. याबाबत कुठलीच तक्रार आली नव्हती. चार महिन्यांपूर्वी दिलेला धनादेश जमा झाला नसल्याची बाब आता माहीत झाली. -राजेश इंगळे, ग्रामसेवक.

# रेशन दुकानदारांनी घेतली आक्रमक भूमिका:

## रेशन दुकानदारांनी ई पॉस मशिन केल्या जमा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ चांदुर बाजार-** स्वस्त धान्य दुकानामार्फत होणाऱ्या रेशन धान्य वितरण व्यवस्थेत पारदर्शकता यावी, या हेतूने राज्यभरात ई-पॉस या बायोमेट्रिक प्रणालीचा वापर सुरू झाला आहे. परंतु, त्याचे सर्व्हर वारंवार डाऊन होत असून स्लो नेटवर्कमुळे लिंक फेल होऊन रेशन वितरणात अडचणी येत आहेत. परिणामी लाभार्थ्यांसह स्वस्त धान्य दुकानदारही त्रस्त झाले आहेत. संतप्त स्वस्त धान्य दुकानदारांनी ई-पॉस मशिन तहसीलदारांकडे सुपूर्द करत मागण्याचे निवेदन दिले.शासनाकडून स्वस्त धान्य दुकानदारास धान्य वाटप करण्यासाठी मिळालेले अत्याधुनिक फाइव्ह जी ई-पॉस मशिन सर्व्हर डाऊनच्या अडचणीमुळे कुचकामी ठरले आहे. सुमारे १० ते १५ दिवसांपासून सर्व्हर सतत बंद असल्यामुळे रेशन वाटप थांबले आहे. त्यामुळे कार्डधारक आणि दुकानदारांमध्ये संघर्षाची स्थिती निर्माण झाली आहे. वारंवार दुकानाच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याने लाभार्थीही आक्रमक झाले आहे. त्यामुळे दुकानदारांची मानसिक स्थिती खराब झाली आहे. सर्व्हर बंदच्या वारंवार त्रासाला कंटाळून तालुक्यातील रेशन दुकानदारांनी कुचकामी ठरलेल्या ई-पॉस मशिन तहसीलदारांकडे सुपूर्द केल्या. या वेळी सुरेश उल्हे, विजय देशमुख, देविदास ढोके, मिलिंद पहाडे, राजेंद्र भांबुरकर, विलासराव पंचभाई, गणेश आवारे, प्रवीण निंभोरकर, स्वप्निल डांगरे, मयूर सोनार तसेच अन्य रेशन दुकानदार उपस्थित होते.



# १३ ऑगस्टपासून संपूर्ण जिल्ह्याचा पाणी पुरवठा बंद होण्याची शक्यता।

## मजीप्रात कार्यकारी अभियंता विरुद्ध कंत्राकदार वाद पेटला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी संचालक नितीन उपरेलू यांची कंत्राटदारांसोबतची असभ्य वागणूक आहे. त्यांची बदली झाली असताना अद्यापही त्यांना कार्यमुक्त करण्यात आले नाही. त्यामुळे उपरेलू यांच्या नियंत्रणात पुढे काम करणे अशक्य असून, कंत्राटदारांच्या मागण्या पूर्ण न झाल्यास १३ ऑगस्टपासून पाणीपुरवठा बंद करण्यात येईल, असा इशारा समस्त कंत्राटदारांनी दिला आहे.

उपरेलू यांची २ ऑगस्ट रोजी बदली झाली. मात्र, अद्यापही विभागाने ते जाहीर केलेले नाही. १२ ऑगस्टपर्यंत मागणी पूर्ण न झाल्यास जिल्ह्याचापाणीपुरवठा बंद करण्यात येईल. यावेळी धनंजय बंड, गणेश भुसे, मंगेश बदनखे, सय्यद अख्तर, नितीन शिरभाते. आदी उपस्थित होते.



कंत्राटदारांनी दिलेल्या निवेदनात दर्यापूर शहर, अंजनगाव व १५ गावांसाठी पाणीपुरवठा योजना दर्यापूर शहरात ९३२४, अंजनगाव शहरात ९६३६ आणि १५० गावांमध्ये ३१९३७, ७९ गाव योजनेत १२९५७, १०५ ग्रामीण पाणीपुरवठा योजनेंतर्गत सुमारे १७२०५, अमरावती शहर १ लाख ५ हजार आणि चिखलदरा पाणीपुरवठा योजनेंतर्गत ९४७ नळ जोडण्या देण्यात आल्या आहेत. हा पाणीपुरवठा बंद करण्यात आल्यास जिल्ह्यातील लाखो नागरिकांची पाण्यासाठी अडचण होणार आहे.

# तिवसा, भातकुली येथे १३ ऑगस्ट पासून प्रशासक राजअध्यक्ष, उपाध्यक्षांचा कार्यकाळ संपला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ तिवसा–** जिल्ह्यातील दोन नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदाची आरक्षण सोडत काढण्यात आली नाही. अशातच मंगळवारी (दि. १३ ऑगस्ट) तिवसा व भातकुली या दोन नगरपंचायतीच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षांचा अडीच वर्षांचा कार्यकाळ संपुष्टात येत असल्यामुळे या दोन्ही नगरपंचायतीवर बुधवार (दि.१४ ऑगस्ट) पासून प्रशासकराज सुरू होणार आहे. या नगरपंचायतीच्या अध्यक्ष, उपाध्यक्षाची धुरा प्रशासक म्हणून तिवसा व भातकुलीचे उपविभागीय अधिकारी सांभाळणार आहेत.




राज्यातील १०५ नगरपंचायतींच्या नगराध्यक्ष पदाची मुदत ऑगस्ट ते सप्टेंबर २०२४ या कालावधीमध्ये संपुष्टात येत आहे. यामध्ये जिल्ह्यातील तिवसा व भातकुली या दोन नगरपंचायतींचा समावेश आहे. विशेष म्हणजे या नगरपंचायती मधील नगराध्यक्षपदाची सोडत अद्याप काढण्यात आली नाही. त्यामुळे या नगरपंचायतीवर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्यागिक नगरी अधिनियम १९५६ च्या कलम ६० नुसार तिवसा व भातकुली या नगरपंचायतीच्या नगराध्यक्षांचा अडीचवर्षाचा कालावधी हा मंगळवार, १३ ऑगस्टला संपत आहे. त्यामुळे या दोन्ही नगरपंचायतीमधील नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांची अधिकार पदे एकाच वेळी रिक्त होत असल्यामुळे या ठिकाणी नवीन नगराध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड पूर्ण होईपर्यंत तिवसा व भातकुली नगरपंचायतीवर अध्यक्ष व उपाध्यक्षांचा कारभार सांभाळण्यासाठी प्रशासक म्हणून दोन्ही ठिकाणचे उपविभागीय अधिकारी यांच्याकडे बुधवार (दि.१४ ऑगस्ट) पासून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी ८ ऑगस्टला जारी केले आहेत. विशेष म्हणजे आता जिल्ह्यातील सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक राजवट आहे.

> राज्यातील ७० टक्के नगरपंचायतीवर काँग्रेस व महाविकास आघाडीतील पक्षाकडे आहेत. संविधानाने दिलेल्या अधिकाराची गळचेपी करणार हा निर्णय असून, केवळ विरोधकांच्या हातात असलेल्या नगरपंचायतीमधील विकासकामांत अडथळा करण्याचा भाजप सरकारचा प्रयत्न आहे.
>
> **योगेश वानखडे,** नगराध्यक्ष नगरपंचायत तिवसा.

# विद्या परिषदेतून डॉ. नितीन चांगोले व डॉ. विद्या शर्मा यांची व्यवस्थापन परिषदेवर निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विद्या परिषदेची सभा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. व्यवस्थापन परिषदेवर डॉ. नितीन वसंतराव चांगोले, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती यांची अविरोध, तर डॉ. विद्या अनंत शर्मा, नरसिम्हा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांची, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर डॉ. जी. आर. ढोकणे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चिखलदरा, जि. अमरावती यांची, विद्यापीठ शिक्षक कल्याण निधी समितीवर डॉ. पी.एम. जावंधिया, पंकज लड्डड, इन्स्टिटएुट ऑफ टेक्नॉलॉजी अॅन्ड मॅनेजमेंट स्टडीज, येलगांव, जि. बुलडाणा यांची अविरोध व डॉ. एच. एस. चांडक, जी.एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांव, जि. बुलडाणा यांची तर विद्यापीठ विद्यार्थी कल्याण निधी समितीवर डॉ. अरुणा वाडेकर, महिला महाविद्यालय, अमरावती या सदस्यांची निवड झाली.




विद्या परिषद सभेत निवडणूक घेण्यात आली. व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या एका सदस्यांसाठी डॉ. विद्या अनंत शर्मा व डॉ. वर्षा श्रीधर सुखदेवे हे उमेदवार निवडणूक रिंगणात उभे होते. या सदस्यांमध्ये डॉ. विद्या अनंत शर्मा यांना ४८ तर डॉ. वर्षा श्रीधर सुखदेवे यांना २४ मते मिळालीत आणि डॉ. शर्मा यांना विजयी घोषित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळासाठी एका जागेकरीता डॉ. काशीनाथ विनायक ब–हाते व डॉ. जी.आर ढोकणे हे उमेदवार सदस्य रिंगणात होते. यापैकी डॉ. ब–हाटे यांना १९ तर डॉ. ढोकणे यांना ४१ मते मिळालीत व डॉ. ढोकणे विजयी झालेत.

शिक्षक कल्याण निधी समितीवर निवडून द्यावयाच्या एका जागेकरीता डॉ. एच.एस. चांडक व डॉ. नामदेव ढाले हे उमेदवार सदस्य रिंगणात होते. यापैकी डॉ. चांडक यांना ४० तर डॉ. ढाले यांना २० मते प्राप्त झालीत व डॉ. चांडक विजयी झालेत. विद्यार्थी कल्याण निधी समितीवर एका जागेसाठी डॉ. अरुणा वाडेकर अविरोध निवडून आल्यात.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी काम पाहिले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व्यासपीठावर उपस्थित होते. सभेला ६१ सदस्य उपस्थित होते. निवडणुकीसाठी प्राचार्य डॉ. राजेश जयपूरकर यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्य डॉ. सुभाष गवई व प्राचार्य डॉ. जयंत कावरे या सदस्यांची छाननी समिती गठीत केली होती. निवडणुकीच्या व सभा आयोजनाच्या कामामध्ये विद्या विभागाचे उपकुलसचिव श्री ऋतुराज दशमुखे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्या विभागातील कर्मचा–यांनी सहभाग दिला. मत मोंजणीच्या कामासाठी सहा. कुलसचिव डॉ. विरेंद्र निमजे, श्री जय भडके व श्री अनिल मेश्राम यांनी व सहकारी कर्मचा–यांनी परिश्रम घेतले.

> ## सहपत्र डिजिटल स्वरुपात देण्याचा निर्णय
>
> गुरुवारी संपन्न झालेल्या विद्या परिषदेच्या सभेत विषय पत्रिकेसोबत द्यावयाच्या सहपत्राचे स्वरुप मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे सहपत्र डिजिटल स्वरुपात उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव सभागृहात मान्य करण्यात आला.

# अखेर दहेंद्री ढाणा येथील रुग्णांना मिळाले तातडीने औषधोपचार

## रवी राणा यांनी घेतली रुग्णाची भेट,२५ लाखांच्या मदतीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ चिखलदरा** चिखलदरा तालुक्यातीलचूर्णी येथील दहेंद्र–ढाणा येथील विहिरीतील दूषित पाण्यामुळे ४३ आदिवासी बांधव आजारी असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, आमदार रवी राणा यांनी तातडीने ग्रामीण रुग्णालयात धाव घेऊन रुग्णांची भेट घेतली. जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याशी तातडीने संपर्क साधून त्यांनी गावात बोलाविले. वैद्यकीय पथक आणि तत्काळ शिबिर आयोजित करून गावकऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. रुग्णांवर योग्य ते औषधोपचार करण्यात आले. दूषित पाण्याने गंभीर आजारी पडून मृत्युमुखी पडलेल्या सुनील येवले नामक तरुणाच्या कुटुंबीयांची आमदार रवी राणा यांनी भेट घेत विचारपूस करीत सांत्वन केले तसेच येवले कुटुंबियांनातातडीने २५ लाखांची मदत डीपीसीतून देण्याची मागणी त्यांनी केली. तसेच परिवाराला मदत मिळवून देण्याचे अभिवचन आमदार रवी राणा यांनी दिले.यावेळी राजेश वर्मा, नागेश मुंडे, सोनू मालवीय, आयुष मालवीय, किशोर बैठेकर, परशुराम बैठेकर, भानूधिकार, रामदास बछले, शामराव जामुनकर, हरिओम बेलकर, विनोद हरसुले, किशोर सावलकर, राजू दरसिंबे, रोंगे धिकार, भाकलू चिमोते, अश्विन मालवीय, रामाप्रसाद राजने, मदन चतुर, भानुदास कसदेकर, संजू कसदेकर आदी उपस्थित होते.



# पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा; ३५ उमेदवारांची अंतिम निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर अमरावती व शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने शनिवार दि. ३ ऑगस्ट रोजी दृक–श्राव्य सभागृह, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे पंडित दीनद्याल उपाध्याय महिला रोजगार मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात या नांमाकित कंपनीमध्ये ३५ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.

उमेदवार रोजगार मेळाव्यामध्ये ऑनलाईन, ऑफलाईन असे एकुण १७०० उमेदवारांनी सहभाग नोंदवून त्यापैकी ६०० उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखती दिल्या. मुलाखती दिलेल्या उमेदवारांपैकी ३१० उमेदवारांची प्राथमिक व ३५ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. मेळाव्याकरिता जिल्ह्यातील आणि इतर जिल्ह्यातील उमेदवार उपस्थित राहून मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.यावेळी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना म्हणाले की, कौशल्य विकास कार्यालयाव्दारे बेरोजगार उमेदवारांकरीता विविध उपक्रम राबविण्यात येवून उमेदवारांना रोजगार स्वयंरोजराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम अतिशय चांगल्या प्रकारे कौशल्य विकास कार्यालय तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ करत आहेत. याचा लाभ सर्व उपस्थित उमेदवारांनी घ्यावा व उपस्थित उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांची नियुक्ती झाली नाही. त्यांनी निराश न होता. नव्याने पुन्हा सुरूवात करावी. तसेच नव्याने सुरू झालेली मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा सुध्दा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहेत.

कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मार्गदर्शन केले. उमेदवारांनी नुसते नोकरीच्या मागे न लागता आपल्यामध्ये कौशल्य विकास कसा होईल याकडे लक्ष द्यावे. तसेच उपलब्ध असलेले विविध अल्प कालावधी कोर्सेस करावे, असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्र व शासकिय औद्यौगिक प्रशिक्षण संस्थाचे अधिकारी व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंट, बडनेरा–अमरावतीच्या

# ३१५ विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपनीत निवड




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड मॅनेजमेंट, बडनेरा–अमरावती येथे संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष अॅड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, कार्यकारिणी सदस्य मा. श्री. नितीन हिवसे, प्रा. डॉ. सौ. पूनमताई चौधरी, पकंज देशमुख, प्रा. विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश हरकुट यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते. याचाच भाग म्हणुनविद्यार्थी रोजगार निर्मिती व प्लेसमेंट साठी विविध कंपन्यांना निमंत्रित करण्यात येते .व विध्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येते, या वर्षी या १९ बहुराष्ट्रीय कंपनीत ३१५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. ही निवड विविध शाखेतून निवड करण्यात आली. यासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ शशिकांत थोरात, प्रा. कुणाल गोहाड, डॉ . सौरभ शहा, प्रा. कृणाल पनपालिया, प्रा. लक्ष्मीकांत काळकोंडे, प्रा. राहुल वानखडे, प्रा आतिफ सईद यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ‘स्वातंत्र्योत्तर महसूली कायदे’ विषयावर कार्यशाळा संपन्न

## महसूली कायदे : लोकहितकारी व समाजवादी –सहाय्यक आयुक्त श्यामकांत मस्के

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती –** महसूल विभागाव्दारे १ ऑगस्टपासून राज्यात सर्वत्र ‘महसूल पंधरवडा’ साजरा केला जात आहे. या कालावधीत शासनाच्या विविध योजनांचा व्यापक प्रचार–प्रसार करुन त्याचा लाभ नागरिकांना मिळवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. महसूली कायदे हे संपूर्णत: लोकहितकारी असून भारतीय राज्य घटनेतील ‘समाजवादी’ या शब्दाला केंद्रस्थानी ठेवून ते निर्माण करण्यात आले आहे, असे प्रतिपादन सहाय्यक आयुक्त (भूसुधार) श्यामकांत मस्के यांनी केले. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात ‘महसूल पंधरवडा’ निमित्त ‘स्वातंत्र्योत्तर महसूली कायदे’ या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना श्री. मस्के बोलत होते. यावेळी सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा व्यासपीठावर उपस्थित होते.

श्री. मस्के म्हणाले की, भारत हा लोकशाही प्रजासत्ताक देश आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान संमत झाले असून २६ जानेवारी १९५० रोजी पासून त्याची अंमलबजावणी झाली. लोकशाही पध्दती म्हणजे लोकांच्या हिताच्या दृष्टीने केलेले कायदे होय. राज्याच्या निती निर्देशक तत्वांनुसार लोककल्याण कारी महसूली कायदे निर्माण करण्यात आले आहे. समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगिण विकासा च्या दृष्टीने तसेच समान तत्वाने संपत्तीचे वितरण होण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर महसूली कायदे अंमलात आणले गेले आहेत, अशी माहिती त्यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन करताना दिली.यावेळी श्री. मस्के यांनी विविध महत्वपूर्ण महसूली कायद्यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. महाराष्ट्र शेतजमीन (धारण जमीनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध व त्यांचे एकत्रीकरण) अधिनियम १९४७ या कायद्यानुसार धारण जमीनीचे एका प्रमाण क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचा तुकडा पाडण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. सध्या हे प्रमाणक्षेत्र कोरडवाहू शेतीसाठी २० आर व बागायत क्षेत्रासाठी १० आर इतके आहे.



मुंबई शेतजमीन व कुळवहीवाट अधिनियम १९४८, हैद्राबाद शेतजमीन व कुळवहीवाट अधिनियम १९५६, महाराष्ट्र शेतजमीन व कुळवहीवाट अधिनियम (विदर्भ प्रदेश) १९५८ यासंदर्भात त्यांनी मार्गदर्शन केले.

आचार्य विनोबा भावे यांनी सुरु केलेल्या भूदान यज्ञ चळवळीसाठी तयार करण्यात आलेल्या मध्यप्रदेश भूदान यज्ञ अधिनियम –१९५३ व मध्यप्रदेश जमीन महसूल संहिता १९५४ या कायद्यासंबंधी माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ नुसार जमीन धारणेची कमला मर्यादा ठरवून देण्यात आली असून कायद्याच्या पहिल्या अनुसूचीमध्ये जमीनीच्या वापरानुसार वेगवेगळी मर्यादा ठरवून देण्यात आली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ हा सर्वात महत्वपूर्ण कायदा असून महाराष्ट्रातील वन जमीन वगळता इतर सर्व जमीनीचे व्यवस्थापन या कायद्यांतर्गत केले जात असून जमीन मंजूर करणे, आकारणी, मोजणी, वापरात बदल, जमीनीबाबतचे वाद मिटविणे इत्यादी अनेक कामे या कायद्यान्वये केली जातात, अशी माहिती श्री. मस्के यांनी यावेळी दिली.महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमीनी प्रत्यार्पित करणे अधिनियम १९४७ अनुसार आदिवासी खातेदाराची जमीन विनापरवानगी हस्तांतरीत झाली असल्यास ती मुळ आदिवासी खातेदारास प्रत्यार्पित करण्याची तरतूद आहे. अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम २००६ या कायद्यानुसार आदिवासी व इतर पारंपारीक वन निवासी यांनी वन जमीनीवर सन २००५ पूर्वी अतिक्रमण केले असल्यास त्यांना त्या वनजमीनीवर शेती करण्यासाठी वनहक्क प्रदान करण्यात येतो. विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकारी–कर्मचारी यावेळी कार्यशाळेला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कर्मचाऱ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे निरसनही श्री. मस्के यांनी यावेळी केले. सुत्र संचालन व आभार प्रदर्शन पंकज कोंडे व विजय सुर्यवंशी यांनी केले.

# अलमास नगर जुनीवस्ती बडनेरा येथे स्वच्छता ड्राईव्ह मोहीमेचा शुभारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–** महानगर पालिका दक्षिण झोन क्रमांक ४ अंतर्गत बडनेरातील अलमास नगर येथे गुरुवारी (दि. ८) सकाळी स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ महानगरपालिका उपायुक्त माधुरी मडावी यांच्या हस्ते करण्यात आला. सदर मोहिमेत महापालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांसह शहरातील स्वच्छता प्रेमी नागरिक, ज्येष्ठ नागरिक, इतर कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी सक्रीय सहभाग नोंदवून विविध ठिकाणच्या संपूर्ण परिसरात स्वच्छता करून कचरा उचलून घेतला आहे. या विशेष मोहिमेंतर्गत रस्ते–पदपथ धूळमुक्त करण्याबरोबरच बेवारस मोकाट जनावरे यांना बंदिस्त करणे, विनापरवाना फलकांवर कारवाई, सार्वजनिक प्रसाधनगृहांची स्वच्छता, राडारोडामुक्त परिसर, नाली स्वछता धुवारणी, फवारणी, झाडे कटाई, साथीच्या रोगाबाबत जनजागृती करण्यात आली. या मोहिमेत परिसरातील रस्त्यार्च सफाई करण्यात आली. महानगरपालिक उपायुक्त मडावी यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत असलेल्या सखोल स्वच्छता मोहिमेत विभाग पातळीवर व्यापक स्वरूपात कारवाई केली जात आहे.कामगार–कर्मचाऱ्यांनी संयंत्राच्या सहाय्याने ही कामगिरी केली आहे. जेसीबी, ट्रक, कचरा गोळा करणारी वाहने, शक्तीमान, कटर मशीन आणि अन्य अद्ययावत यंत्रणाही दिमतीला आहे. दैनंदिन स्वच्छता कामे अविरत सुरू असतांना सखोल स्वच्छता मोहिमेच्या निमित्ताने शहरातील कानाकोपऱ्यातील, लहानसहान गल्लीबोळातील राडारोडा, कचरा उचलण्यासह स्वच्छतेची इतरही कार्यवाही होत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. यावेळी उपायुक्त माधुरी मडावी यांनी उपस्थितांना पर्यावरणाचे महत्व पटवून दिले. याशिवाय उपस्थितांमध्ये पर्यावरण विषयक जागरुकता करुन प्लास्टीक प्रतिबंधाबाबत उपायुक्त माधुरी मडावी यांनी मार्गदर्शनही केले.



यावेळी मनपा सहाय्यक आयुरुत धनंजय शिंदे, भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ अजय जाधव, पशुशल्य चिकीत्सक डॉ. सचिन बोंद्रे, उद्यान अधिक्षक विवेक देशमुख, वैद्यकीय अधिकारी डॉ. संदिप पाटबागे, उपअभियंता श्रीरंग तायडे अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे श्याम चावरे, वैद्यकीय अधिकारी, ज्येष्ट स्वास्थ निरीक्षक, स्वास्थ निरीक्षक, सफाई कामगार, पारिचारीका, मनपा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘घरोघरी तिरंगा अभियान’ आता लोकचळवळ : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## घरोघरी तिरंगा अभियानाचा ऐतिहासिक ऑगस्ट क्रांती मैदान येथून राज्यस्तरीय शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ मुंबई**

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लाखो स्वातंत्र्य सैनिकांनी प्राणाचे बलिदान दिले. त्यांच्या त्याग आणि बलिदानाची जाणीव ‘घरोघरी तिरंगा अभियान‘ आपल्याला सतत करून देईल. घरोघरी तिरंगा अभियान राष्ट्रप्रेमाची नवी उभारी देईल, कारण आता हे अभियान लोकचळवळ बनले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.




सांस्कृतिक कार्य विभाग, मुंबई महानगरपालिका यांच्या वतीने ऑगस्ट क्रांती मैदान येथे आज घरोघरी तिरंगा ( हर घर तिरंगा) अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नगरविकास विकास विभागाचे प्रधान सचिव के. गोविंद राज, मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी व अतिरिक्त आयुक्त अमित सैनी, मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव यांची यावेळी उपस्थिती होती.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीत १९४२ रोजी याच ऐतिहासिक ऑगस्ट क्रांती मैदान येथून चले जाव चा नारा देण्यात आला. त्यानंतर स्वातंत्र्यासाठीचे हे आंदोलन अधिक व्यापक झाले. लाखो जणांनी आपले प्राण या देशासाठी अर्पण केले. या देशप्रेमाची, शहिदांच्या बलिदानाची आठवण आणि शहीद वीरांप्रती कृतज्ञता म्हणून आपण देशभरात आपल्या राष्ट्रध्वजाविषयी नव्या पिढीत आत्मीयता निर्माण करत आहोत. मागील दोन वर्षात राज्यात घरोघरी तिरंगा अभियान मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, यावर्षीही राज्यातील अडीच कोटी घरावर तिरंगा फडकवला जाणार आहे. देशप्रेमाची भावना त्याद्वारे जागवली जाणार आहे. विविध दुकाने, आस्थापना यांच्यावरही तिरंगा फडकवला जाणार आहे. आपल्या राष्ट्र ध्वजातील तिरंगा रंग केशरी, पांढरा आणि हिरवा हे रंग त्याग, धैर्य, प्रेम, शांतता आणि विश्वासाचे प्रतीक आहेत. नव्या पिढीत हीच प्रेरणा आणि विश्वास निर्माण करण्याचे काम हे अभियान करणार आहे. अधिक उत्साहात आणि जल्लोषात हे अभियान साजरे करून राज्यभरात देशभक्तीचा मळा फुलणार आहे आणि देशप्रेमाचा सुगंध वाहणार आहे.

या अभियानात गावागावात, शहरात रॅली, पदयात्रा, तिरंगा सेल्फी, स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार अशा माध्यमातून हे अभियान साजरे करायचे आहे. सर्वांच्या सहकार्यातून हे अभियान यशस्वी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्यात विकास आणि कल्याणकारी योजनाच्या माध्यमातून नागरिकांची सेवा करण्याचे काम राज्य शासन करत असल्याचेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नमूद केले.

आपल्या खेळाडूंनी ऑलिम्पिक स्पर्धेत विविध पदक मिळवून तिरंगा फडकवला, याचा अभिमान आपल्या सर्वांना आहे. आपल्या राज्याच्या स्वप्नील कुसाळे यांच्यासह नीरज चोप्रा, मनू भाकर, हॉकी संघाने पदक पटकावले. ही खरोखरच अभिमानाची आणि आनंदाची बाब असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी नमूद केले.

प्रास्ताविकात अपर मुख्य सचिव श्री. खारगे म्हणाले की, देशभरात घरोघरी तिरंगा अभियान राबविले जात आहे. राज्यातही मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात हे अभियान साजरे केले जात आहे. या अभियानात मागील दोन वर्षा प्रमाणेच आपले राज्य आघाडीवर राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमापूर्वी मुख्यमंत्री श्री. शिंदे आणि इतर मान्यवरांनी हुतात्मा स्मृती स्तंभास अभिवादन केले. कार्यक्रमानंतर पदयात्रा आणि सायक्लाथॉन यात्रेस यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला. यानंतर मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी तिरंगा कॅनव्हास वर स्वाक्षरी केली आणि त्याठिकाणी असलेल्या घरोघरी तिरंगा अभियानाच्या सेल्फी पॉईंटवर सेल्फीही घेतली. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी उपस्थितांना तिरंगा प्रतिज्ञा दिली. या कार्यक्रमास विविध मान्यवरांसह शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाजारात दहा रुपयांच्या नाण्यांना वाढली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मोर्शी**

व्यवहारामध्ये दहा रुपयांची नाणे पूर्वी सहसा कोणी घेत नव्हते. आता मात्र या नाण्यांना चांगलीच मागणी वाढल्याने चांगले दिवस आले आहेत. चलनात दहा रुपयांच्या नोटा कमी झाल्यामुळे दहा रुपयांच्या नाण्यांचा वापर वाढला आहे.




भारतीय चलनात २००५ मध्ये दहा रुपयांचे नाणे पहिल्यांदाच बाजारात आले. आल्यानंतर ती बँकांमध्ये मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देण्यात आली. मात्र, याच काळात दहा रुपयांची नाणी व्यवहारात स्वीकारत असताना नाराजीचा सूर असे. त्याचे कारण ही नाणी वजनदार होती. त्यामुळे ग्राहक व व्यावसायिक यांच्यात खटके उडायचे. बँकांसह पतसंस्था, तसेच वित्तीय संस्थांमध्ये हजारो रुपयांची नाणे पडून असल्यामुळे त्यांनाही आर्थिक झळ बसली. ग्राहकांना न मागता १००, २००, ५०० रुपयांमध्ये दहाचे नाणे दिले जाऊन चलनात आणले गेले. मात्र, तरीही ग्राहक ते स्वीकारत नसल्यामुळे जो कोणी दहा रुपयाचे नाणे घेण्यास नकार देईल,त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशा भाषेत शासनाच्या आदेशाचे फलक दुकानांवर लावलेले दिसत होते. सूचना दिल्या जात होत्या. एकंदरीत, दहा रुपयांची नाणी सर्वांनाच नकोशी होती. मात्र, गेल्या सहा महिन्यांपासून १० रुपयांच्या नाण्यांना सुगीचे दिवस आले आहेत.

**कारण काय ?**

१० रुपयांच्या जीर्ण झालेल्या चलनातील नोटा बँकांमध्ये जमा होत गेल्याने व्यवहारात १० रुपयांच्या नोटांची कमतरता भासत आहे. शिवाय जीर्ण नोटा घेण्यास नागरिक तयार होत नसल्याने १० रुपयाच्या नाण्यांचा व्यवहारात मोठ्या प्रमाणावर वापर वाढला आहे. आता व्यापारी बांधवही दहा रुपयांच्या नाण्यांची बँकामध्ये मागणी करताना दिसत आहेत. त्यामुळे या नाण्यांचाही सध्या तुटवडा जाणवत आहे.

# महाडीबीटी संकेतस्थळ आठवड्यापासून बंद, शेतकऱ्यांना नुसते हेलपाटे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अंजनगांव सुर्जी**

राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस, सोयाबीन, इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी विकास योजना गेल्या काही महिन्यांपासून वादात सापडली होती; मात्र १०० टक्के अनुदानावर बॅटरीचलीत फवारणी पंप व नॅनो डी. ए. पी. वितरणासाठी 'महाडीबीटी' वर अर्ज मागविण्याचा निर्णय कृषी आयुक्तालयाने घेतल्यावर सदर व ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख १४ ऑगस्ट असल्याने गेल्या पाच दिवसांपासून संकेतस्थळ बंद आहे. त्यामुळे ऐन खरिपाच्यामोसमात गावखेड्यावरुन शहराच्या ऑनलाईन सेंटरवर शेतकऱ्यांना नुसते हेलपाटे घ्यावे लागत आहे.

राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया आधारित पीक पद्धतीस चालना मिळेल. २०२२ ते २०२५ कालावधीत तीन टप्यात योजना राबविली जाईल. चालू २०२४- २५ आर्थिक वर्षासाठी बॅटरीचलित फवारणी पंपासाठी लाभार्थी निवड होणार असल्याने गावकुसातील शेतकऱ्यांनी महाडीबीटी संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरण्यासाठी शहरातील ऑनलाईन सेंटरवर गेल्या पाच-सहा दिवसापासून अर्ज भरण्यास येत असताना शेतकऱ्यांच्या पदरी संकेतस्थळ बंद असल्याने निराशाच पडत आहे. या होत असलेल्या नुसत्या हेलपाट्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. अर्ज करण्यासाठी १४ ऑगस्टपर्यंत मुदत असल्याने व योजनेत १०० टक्के अनुदानावर बॅटरीचलीत फवारणी पंप व नॅनो डी. ए. पी. मिळवण्याकरिता रीघ लागली असताना 'महाडीबीटी चे संकेतस्थळ अर्जच घेत नसल्याने ऑनलाईन सेंटर चालकांच्यासह अर्जच भरण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

# श्री शिवाजी कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा लसीकरण मोहिमेत सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

वलगाव येथे श्री शिवाजी कृषी महाविद्यालय व पशुवैद्यकीय दवाखाना वलगाव यांच्या सौजन्याने मंगलवार ला भव्य पशुवैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . पावसाळा सुरू झाला असून पावसाळ्यात जनावरांचे लसीकरण गरजेचे असते . त्यामध्ये डॉ शेखर पाटील पशुवैद्यकीय अधिकारी, डॉ राजेश केदारे परीक्षक आणि डॉ प्रफुल्ल चाहकर सहायक अधीकारी यांनी व श्री शिवाजी कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लसीकरण मोहीम हाती घेतली.जनावरांना एक टाग्या आणि घटसरप या आजारापासून सुरक्षा देण्याकरिता



लसीकरण करण्यात आले . गावकऱ्यांनी यात सहभागी होऊन सोताच्या जनावरांना लसीकरण करून घेतले . यात कृषीदूत योगीराज वि खडसे, श्रेयश प बनसोड, अनिकेत ज गाभने, धिरजकुमार देशमुख, नरेंद्र भुजाळे, गौरव दिघोळेसहभाग घेतला होता .

# तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांना जंगली जनावरांच्या त्रासापासून मुक्त करा : सोलर झटका मशीन योजना राबवा काँग्रेसची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ तिवसा**

तिवसा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या शेतीपिकाचे रोही, (नीलगाय)रान डुक्कर व इतर वन्यप्राण्याच्या हैदोस व त्रासामुळे नुकसान होत आहे.शेतकऱ्यांना नुकसान होऊ नये म्हणून वनविभागाच्या कुंपण, सोलर झटका मशीन या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळत असतो परंतु तिवसा तालुक्यातील एक दोन



गाव सोडले तर शासनाच्या महाडीबिटी पोर्टल वर तिवसा तालूक्यातील गावांचा समावेश नाही.याबाबत वनविभागाने दखल घेत तातडीने तिवसा तालुक्यातील गावांचा समावेश करावा तसेच सोलर झटका मशीनच्या अनेक कंपन्या तिवसा येथीलच असून अर्जदार लाभार्थी शेतकऱ्यांना या स्थानिक सोलर झटका मशीन कंपन्याकडुन पुरवठा करावा अशी मागणी उपवनसंरक्षक यांना आमदार यशोमती ठाकूर यांचेपत्र देऊन तथा शिवनगाव (फत्तेपूर ) येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळावायाकरिता श्रीमती ज्योती पवार सहाय्यक वनरक्षक कॅम्पा व वन्यजीवन, अमरावती यांच्याशी निवेदन देऊन व चर्चा करण्यात आली .यावेळी माजी नगराध्यक्ष तथा तालुका काँग्रेस कार्याध्यक्ष वैभव स. वानखडे, नगराध्यक्ष योगेश क. वानखडे, काँग्रेस कामगार सेल अध्यक्ष तथा जिनिंग प्रेसिंग संचालक पंकजभाऊ देशमुख, शिवणगाव सरपंच नंदकिशोर पोलगावंडे, खरेदी विक्री संचालक प्रमोदराव देशमुख, अंकुशभाऊ देशमुख, सचिनभाऊ वानखडे, उमेशभाऊ राऊत, वैभव काकडे, हर्षल कडू, आकाश मकेश्वर उपस्थित होते.

# फत्तेपूर(शिवणगांव) येथील आदिवासी समाज वस्ती, रस्ता नादुरुस्त

## विद्यार्थी म्हणतात आम्ही पाय डोक्यावर घेऊन चालायचे का?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९तिवसा**

तिवसा तालुक्यातील शिवणगांव(फत्तेपूर) ग्रामपंचायत मध्ये येणाऱ्या जिल्हा शाळेतील विध्यार्थी,आदिवासी समाज वस्ती तथा शेतकऱ्याचा रस्ता अनेक वर्ष्या पासून नादुरुस्त आहे.आदिवासी समाजातील मुले आणि मुली त्यांच्या वस्तीपासून ते जिल्हा परिषद शाळा अंदाजे ५०० मी. नादुरुस्त रस्त्याने जातात.या रस्त्याची एवढी दयनीय



अवस्था आहे की पैदल सुद्धा चालता येते नाही.एक महिन्याच्या अगोदर एक आदिवासी विध्यार्थिनी रस्त्याने पडली असता तिला गंभीर जखम झाली होती त्यामुळे ती शाळेत जाऊ शकली नाही.आदिवासी समाजाचा मुख्य रस्ता असल्यामुळे त्यांना भाजीपाला, किराणा, दळण, दवाखान्यात इत्यादी कामासाठी जावे लागते.थोडासा पाऊस आला तर त्यांना रस्त्याने जाण्या येण्याचा मार्ग बंद होतात. शेतकरी सुद्धा ह्याच रस्त्याने जातात.त्यांची बैलबंडी सुद्धा जात नाही.ह्या रस्त्याच्या शेवटी नाला गेला आहे. ह्या नाल्याला पाऊसाचे पाणी आले तर जाण्यायेण्याच्या मार्ग बंद होतात.इकडे शासन म्हणते विध्यार्थी शिक्षणा पासून वंचित राहिले नाही पाहिजे पण रस्त्यामुळे आदिवासी विध्यार्थी शिक्षनापासून वंचित राहतात. ग्रामपंचायत सरपंच सांगतात की जनसुविधेतून ३० लक्ष रुपये निधी टाकून तो रस्ता मंजूर केला आले असून लवकरात लवकर रस्ता चे काम सुरु होईल.

# आंदोलनाला यश : चांदूर बाजार येथील व्यापारी संकुलाला अण्णाभाऊ साठे यांचे नाव मिळाले

## क्रांतिदिनी इमारतीवर चढले,पालिकेच्या कार्यालयात ठिय्या, प्रशासनाने घेतली दखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९चांदूर बाजार**

चांदूर बाजार बेलोरा ऑटो स्टॉप परिसरातील व्यापारी संकुलाला साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे या मागणी साठी दिनांक ९ ऑगस्ट २०२४ क्रांतिदिन रोजी मातंग समाजाच्या व सामाजिक संघटनेच्या आंदोलनाला यश मिळाले असून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाचे तात्पुरता बॅनर लावण्यात येत आहे व येत्या काही दिवसातच कायमस्वरूपी नाव देण्याचे लेखी आश्वासन मुख्यधिकारी यांनी दिले बेलोरा ऑटो स्टॉप परिसरातील व्यापारी संकुलाचे बांधकाम नगर परिषदने केले असून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे या मागणीसाठी दिनांक २ मार्च २०१९ रोजी रोजी सर्वसाधारण सभे मध्ये सर्वानुमते ठराव मंजूर झाला होता की चांदुर बाजार बेलोरा ऑटो स्टॉप परिसरातील व्यापारी संकुलाच्या इमारतीला साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे व सदर कामाकरिता येणाऱ्या सर्व प्रकारचे खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरात देऊन सदर सभेने ठरविले होते तर गेल्या ५ वर्षांपासुन चांदूर बाजार नगर पालिका प्रशासनाने याकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष केले होते तर दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी विविध सामाजिक संघटनेच्या वतीने मुख्यधिकारी यांना वरील मागणी तात्काळ पूर्ण करण्यासाठी निवेदन सुद्धा देण्यात आले होते तसेच दिनांक १५ जुलै २०२४ रोजी सुद्धा मागणी पूर्ण न



झाल्यामुळे निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा देखील देण्यात आला होता पालिका प्रशासनाने निवेदनाची दखल घेतली नाही त्यामुळे दिनांक १ ऑगस्ट २०२४ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती रोजी बेलोरा ऑटो स्टॉप परिसरातील कार्यक्रमा मध्ये समाजिक कार्यकर्ते करण खंडारे यांनी मागणी पूर्ण न झाल्यामुळे दिनांक ९ ऑगस्ट २०२४ क्रांतिदिन रोजी बेलोरा स्टोप परिसरात आंदोलन करण्याचा ईशारा दिला होता आणी शुक्रवारी ९ ऑगस्ट क्रांतदिन रोजी मातंग समाज आणी सामाजिक संघटनेच्या वतीने व्यापारी संकुलावर चढून नगर पालिकेचा निषेद करण्यात आला यासह नगर परिषद कार्यालया मध्ये धडक देऊन ठिय्या आंदोलन देखील करण्यात आले प्रशासनाने याची तात्काळ दखल घेत आंदोलन कर्त्यांच्या मागणी नुसार ९ ऑगस्ट रोजी बेलोरा ऑटो स्टॉप परिसरातील व्यापारी संकुलावर साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाचे तात्पुरता बॅनर लावण्यात येत आहे व येता काही दिवसातच कायमस्वरूपी नाव देण्याचे लेखी आश्वासन मुख्यधिकारी यांनी दिले लेखा विभाग अधिकारी प्रफुल गाडबेल यांनी आंदोलन करत्यांना आंदोलन मागे घेण्याच पत्र दिले पोलीस प्रशासने कायदा व सुव्यवस्था लक्षात घेता बंदोबस्त लावला होता पीएसआय उमाळे, एसआय श्रीकांत निंभोरकर,आशिष इंगळे,गणेश आगोले सह पोलिस कर्मचारी उपस्तित होते याप्रसंगी माजी नगरसेवक गोपाल तिरमारे,माजी नगरसेविका मीरा खडसे,माजी पं.स.सदस्य सचिन हिवराळे, डॉ.राहुल अहिर,राजू तंतरपाळे, संगीता झारखंडे, शारदा तायडे, गोपाल वानखडे, श्रावण चव्हाण, नितेश इंगोले,नामदेव वानखडे, मनीष वाघमारे,अतुल हिवराळे, विक्की ससाणे सह आदी मातंग समाज बांधव व समाजिक संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# आदिवासींचे दैवत भगवान बिरसा मुंडा जी यांच्या चरणी नतमस्तक ....



**आज धारणी येथे मा खासदार सौ नवनीत रवि राणा यांनी आदिवासींचे दैवत भगवान बिरसा मुंडा जी यांच्या चरणी नतमस्तक होऊन जागतिक आदिवासी दिना निमित्त सर्व आदिवासी बंधू-भगिनींना शुभेच्छा दिल्या व मेळघाटातील..... या गावांमध्ये जाऊन सर्वांना आदिवासी दिना निमित शुभेच्छा दिल्या व गावा गावा जाऊन आभार व संवाद साधला**

# श्री गुरुदेव क्रांतीज्योत यात्रेला आजपासून सुरुवात : भारताच्या स्वतंत्र लढ्यात राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचा होता सक्रिय सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ गुरुकुंजमोझरी**

अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम अंतर्गत केंद्रीय प्रचार विभाग द्वारा आयोजित श्री गुरुदेव क्रांती ज्योती यात्रा दिनांक ९ ऑगस्ट २०२४ ते ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत विदर्भात फिरणार आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात लाखो लोकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. हजारो कुटुंबे बरबाद झाली. हजार लोक फासावर गेले. लाखो लोक इंग्रजांच्या गोळीबारात शहीद झाले तसेच जखमी झाले. या सर्व



शहीद हुतात्म्याच्या बलिदानातून आमचा देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी इंग्रजांच्या गुलामगिरीतून स्वतंत्र झाला. या स्वतंत्र लढ्यात वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचा सक्रिय सहभाग राहिलेला आहे. परंतु देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात, इतिहासात याचा किंचितही उल्लेख नाही. तसेच भारताच्या राष्ट्रपुरुषाच्या यादीत अजून पर्यंत राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या नावाचा उल्लेख नाही. ही माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. आज एकूण देशातील वातावरण भक्ता आम्हा भारतीयांना या हुतात्म्याच्या बलिदानाचा विसर पडलेला आहे. असे अत्यंत खेदाने म्हणावे लागते. म्हणून जनतेला व शहीद हुतात्म्याच्या त्यागाची व बलिदानाची जाणीव करून देणे व लोकांच्या मनात राष्ट्रीय भावना जागृत करणे या उद्देशाने ही श्रीगुरुदेव क्रांती यात्रा संपूर्ण विदर्भ भर राष्ट्रीय विचारांचा प्रचार प्रसार करणार आहे. या यात्रेचे पूजन महासमाधीवर संस्थेचे सर्वाधिकारी श्री लक्ष्मण रावजी गमे , उपसभाधिकारी दामोदर पाटील गुरुजी, विलासराव साबळे महाराज, रूपलाल कावळे, निळकंठ हळदे महाराज, सुभाषराव सोनारे यांनी केले. या यात्रेसोबत या यात्रेचे संयोजक श्री प्रकाश महाराज वाघ (प्रचार सेवाधिकारी), यात्रा प्रमुख श्री सुशील बुरडे, श्री अशोकजी चरडे, विठ्ठलराव सावरकर , प्रचार सचिव श्री सुशील वनवे महाराज त्यांच्यासह अनेक गुरुदेव भक्त उपस्थित राहणार आहे.

# सुप्रीम निर्णय; NEET-PG 2024 परिक्षा पुढे ढकलणार नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नवी दिल्ली**

नीट पेपर फुटी प्रकरणावरून देशातील वातावरण ढवळून निघालेले असताना सुप्रीम कोर्टाने विद्यार्थ्यांना मोठा धक्का दिला आहे. येत्या ११ ऑगस्ट रोजी होणारी छएएढ-झज्ञ २०२४ परीक्षा पुढे ढकलण्यास सुप्रीम कोर्टाने नकार दिला, परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावत कोर्टाने करिअर धोक्यात घालू शकत नाही असेही स्पष्ट सांगितले. येत्या ११ ऑगस्ट रोजी होणारी परिक्षा पुढे ढकलण्याची मागणी करणाऱ्या याचिकेत विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षांच्या शहरांबाबत ३१ जुलै रोजी माहिती देण्यात आली होती. तर, परीक्षा केंद्राची माहिती ८ ऑगस्ट रोजी देण्यात आली होती. ही परीक्षा ११ ऑगस्टरोजी होणार आहे. एवढ्या कमी वेळात विद्यार्थ्यांना केंद्रावर पोहोचणे अवघड असल्याने ११ ऑगस्टरोजी होणारी परीक्षा पुढेढकलण्यात यावी अशी मागणी करणारी याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र, सुप्रीम कोर्टाने काही विद्यार्थ्यांच्या गैरसोयीसाठी लाखो विद्यार्थ्यांचे करिअर धोक्यात टाकू शकत नसल्याचे सांगत ही याचिका फेटाळून लावली आहे.

## स्त्री शक्ती सन्मान पुरस्कार वितरण सोहळ्याच्या निमित्ताने....

# सौ.रश्मीताई ठाकरे, खा. सावंत व सुषमाताई अंधारे उद्याला अमरावतीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

शिवसेना पक्षप्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पत्नी सौ रश्मीताई उद्धव ठाकरे, शिवसेनेचे पश्चिम विदर्भ संपर्क नेते खासदार अरविंद सावंत व शिवसेनेच्या मुलुख मैदानी तोफ सुषमाताई अंधारे शनिवार दिनांक १० रोजी अमरावती दौऱ्यावर येत आहे.



शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी मासाहेब स्वर्गीय मीनाताई ठाकरे स्मृती प्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या स्त्री शक्ती सन्मान पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन केले असून या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून सौ रश्मीताई उद्धव ठाकरे, खासदार अरविंद सावंत व शिवसेना नेत्या सुषमाताई अंधारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. त्यांच्या हस्ते कर्तृत्ववान महिलांना स्त्रीशक्ती सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. गेल्या काही वर्षांनंतर सौ रश्मीताई उद्धव ठाकरे या अमरावती दौऱ्यावर येत असल्याने शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून त्यांच्यामध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. सौ ठाकरे या मुंबईवरून नागपूरपर्यंत विमानाने व तेथून कारने अमरावतीला येत असून कार्यक्रमापूर्वी त्या अमरावती जिल्ह्यातील शिवसेनेचे प्रमुख नेते व पदाधिकाऱ्यांसोबत संवाद साधून महिला शिवसैनिकांची भेट घेणार असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी सांगितले.


# कापसाचे उत्पादन घटणार; भरड धान्याचे मात्र वाढणार

## १६.३६ लाख हेक्टरची घट : तेलबियांसह डाळवर्गीय पिकांच्या क्षेत्रात वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ नागपूर**

मागील खरीप हंगामाच्या तुलनेत चालू खरीप हंगामात संपूर्ण देशभरात कापसाचे पेरणीक्षेत्र तब्बल १६.३६३ लाख हेक्टरने घटले आहे. तुलनेत सोयाबीनसह इतर तेलबिया, डाळवर्गीय पिके आणि भरडधान्याच्या पेरणीक्षेत्रात वाढ झाली आहे. देशात कापसाचे उत्पादन घटण्याची शक्यता असून दर मात्र दबावात राहणार आहेत.

२ ऑगस्टपर्यंत देशभरात ९०४.६० लाख हेक्टरवर विविध खरीप पिकांची पेरणी करण्यात आली. मागील हंगामाच्या तुलनेत यावर्षी डाळवर्गीय पिकांचे पेरणीक्षेत्र १०.९० लाख हेक्टर, भरडधान्याचे ५.२१ लाख हेक्टर, सोयाबीनचे ३.२६ लाख हेक्टर, तेलबियांचे ५.९० लाख हेक्टर, तर धानाचे क्षेत्र १३.९० लाख हेक्टरने वाढले आहे. मागील वर्षी १२५.२०० लाख हेक्टरवर कापसाची पेरणी झाली होती. यंदा ६ ऑगस्ट पर्यंत १०८.८३७ लाख हेक्टर क्षेत्र आहे.




**कापूस पेरणीक्षेत्र (लाख हेक्टर) (६ ऑगस्टपर्यंत)**

देशातील १० प्रमुख कापूस उत्पादक राज्यांमध्ये महाराष्ट्रासह गुजरात व इतर राज्यांमध्ये कापसाचे पेरणीक्षेत्र चार हजार ते ३.३० लाख हेक्टरने घटले आहे.

**कुठे फायदा, तर कुठे फटका**

अतिपाऊस आणि सततच्या ढगाळ हवामानामुळे विदर्भातील कापसाची अवस्था सध्यातरी वाईट आहे. खान्देश, मराठवाड्यासह राज्यातील इतर भागात तसेच तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक तसेच मध्य प्रदेश व गुजरातमध्ये पिकांची अवस्था चांगली असल्याचे तेथील शेतकऱ्यांनी सांगितले.

# अमरावतीमध्ये लाखो रुपयांची नकली देशी दारू बनवणाऱ्या कारखान्यावर पोलिसांची धाड : रु. १०,९०,२४८ चा माल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

अमरावती शहरातील जुनी एमआयडीसी परिसरात हर्ष सपकाळ नावाच्या गृहस्थाने जागा भाड्याने घेऊन नकली देशी बॉबी दारू बनवण्याचा गोरख धंदा गेल्या पाच महिन्यापासून सुरू होता,मात्र तो गुरुवारी रात्री अमरावती गुन्हे शाखेच्या पोलीस विभागाने उध्वस्त केला. यामध्ये लाखो रुपयांचा नकली देशी दारू, केमिकल चा माल सुद्धा जप्त केला आहे.हर्ष सपकाळ हा मुंबईवरून केमिकल विकत आणून अहमदनगर कोपरगाव येथील कंपनीच्या नावाने बॉबी ९० ाश्र बॉटलवर नकली रजिस्ट्रेशन नंबर टाकून संपूर्ण जिल्ह्यामध्ये ती दारू विकत होता. पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी या गोरखधंदयावर छापा टाकून तेथून लाखो लिटर केमिकल,प्रिंटिंग मशीन, व दारूच्या रिकाम्या बॉटल जप्त केले आहे. यामध्ये पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर यांच्यासह गुन्हे शाखेच्या युनिट १ ने कारवाई केली.



अमरावती एमआयडीसी परिसरातील प्लॉट नं. ई २६ या ठिकाणी असलेल्या फॅक्टरीमध्ये काही इसम आपल्या आर्थीक फायद्याकरीता अवैधरीत्या बनावटी देशी दारूची निर्मीती करीत आहे अशी गुप्त बातमीदाराकडून खात्रीलायक माहीती मिळाली होती. त्यामुळे लागलीच वरिष्ठांना माहीती देवून सदर पथकांने दोन शासकीय पंचांना सोबत घेवून मिळालेल्या माहीतीप्रमाणे अमरावती एमआयडीसी परिसरातील प्लॉट नं. ई २६ या ठिकाणी जाउन फॅक्टरीमध्ये रेड केली असता सदर ठिकाणी १) हर्षवर्धन रमेश सपकाळ वय ४२ वर्ष रा. मोतीनगर बगीच्याजवळ, अमरावती २) सागर सुरेश तिवारी वय ४३ वर्ष लॉर्डस हॉटेलच्या मागे, गणपती नगर, अमरावती ३) योगेश विकास प्रधान वय २४ वर्ष काम मजुरी रा. गल्ली नं. ९. किरण नगर, अमरावती हे तीन इसम आपल्या आर्थीक फायद्याकरीता सदर ठिकाणी देशी दारू बॉबी संत्रा आणि देशी दारू टैंगो पंच कंपनीच्या देशी दारूच्या नकली मालाची निर्मीती करताना रंगेहात पकडले. सदर ठिकाणी आरोपीतानी अहमदनगर येथे असलेल्या बॉबी आणी संजीवणी देशी दारू संजिवणी डिस्टीलरी सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना लिमीटेड ता. कोपरगाव जि अहमदनगर महाराष्ट्र येथे निर्मीत होत असलेल्या देशी दारू बॉबी संत्रा आणि देशी दारू टैंगो पंच या मुळ कंपनीप्रमाणेच हुबेहुब देशी दारूचा नकली माल तयार करण्याकरीता आवश्यक असलेले अल्कोहोल, ऑरेंज फ्लेवर, आर ओ प्लांट, बॉटल फिलीग मशीन, कॅप्रींग मशीन, प्रिंटींग साहीत्य, बॉक्स, रिकाम्या बॉटल, स्टॅम्प, प्रींटेड सेलो टेप व इतर साहीत्याच्या माध्यमातुन नकली बनावटी संजीवणी देशी दारू या ब्रांडची निर्मीती करताना मिळून आले. आरोपी हे सदर निर्मीती केलेला नकली माल आपल्या इको स्पोर्ट कार क्र. एम एच ३५ पी ५९१९ ने अमरावती जिल्हयातील अवैधरीत्या किरकोळ विक्रेत्यांना विकत होते. आरोपीतांकडून ९० मिली नकली देशी दारूने भरलेल्या बॉटल असलेले ३४०० बॉटल, ३५ लीटर क्षमतेच्या फार्मग्रिड अल्कोहोलने भरलेल्या एकुण २१ कॅन, गोल्डन ऑरेंज फ्लेवरच्या ५ लीटर क्षमतेच्या ७ कॅन, निर्मीती करीता वापरलेल्या वेगवेगळ्या मशीनरी, प्रींटींग साहीत्य, आणि इको स्पोर्ट कार क्र. एम एच ३५ पी ५९१९ असा एकुण असा एकुण १०,९०,२४८ रू चा माल जप्त करण्यात आला.सदर ची कार्यवाही सदरची कार्यवाही नविनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त अमरावती शहर यांचे आदेशाने श्रीमती कल्पना बारवकर पोलीस उपायुक्त (मुख्यालय) व गणेश शिंदे पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र २. अमरावती शहर तथा दत्तात्रय भवर सहायक पोलीस आयुक्त राजापेठ विभाग यांचे मार्गदर्शनाखाली गोरखनाथ जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा युनिट क्र. १. स.पो.नि. मनिष वाकोडे, योगेश इंगळे, अनिकेत कासार पोउपनि प्रकाश झोपाटे, पो.हवा फिरोज खान, पो.शी. सुरज चव्हाण, अमोल मनोहर, निखील गेडाम, अनिकेत वानखडे, सुधीर गुडघे, अलीमोद्दीन खातीम यांनी केली.

# श्रावणात करा 'एसटीसंगे तीर्थाटन' शेगाव, शिर्डी, पंढरपूर, तुळजापूर चला अर्ध्या तिकिटात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

व्रतवैकल्यांचा महिना म्हणजे श्रावण. या काळात विविध धार्मिक कार्यक्रम होतात. प्रमुख देवस्थानालादेखील दर्शनासाठी भाविकांची गर्दी होते. विशेषतः महिलांची संख्या अधिक असते. त्यामुळे भाविकांची गर्दी लक्षात घेता राज्य परिवहन महामंडळाने 'श्रावणात एसटी संगे तीर्थाटन' उपक्रम सुरू केला आहे. त्यामुळे आता शेगाव,



शिर्डीसह राज्यातील अन्य ठिकाणी दर्शनाला जाण्यासाठी एसटीने प्रवास करणे सुलभ होणार आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून सण-उत्सवादरम्यान प्रवाशांसाठी विशेष बससेवेचे नियोजन केले जाते. ५ ऑगस्टपासून श्रावण महिन्याला सुरुवात झाली आहे. या काळात मोठ्या संख्येने भाविक महादेव मंदिरात दर्शनासाठी जातात.शिवाय विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात असल्याने मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातूनही भाविक दर्शनासाठी गर्दी करतात.

जिल्ह्यातील भाविकांना शेगाव, शिर्डीसह अन्य ठिकाणी देवदर्शनासाठीजाता येणार आहे. एसटी महामंडळाकडून विशेष बससेवेचे नियोजन करण्यात आले असून, यामधून महामंडळाला अधिक उत्पन्नमिळण्यास मदत होणार होणार आहे. यासाठी एसटी महांडळाने तयारी केली असून प्रवाशांना सुविधा देण्यात येणार आहे.

जिल्ह्यातून प्रवाशांच्या मागणीनुसार एसटी महामंडळाकडून विशेष बस सेवा सुरू करण्यात येणार आहे. यासाठी अधिक बसचे नियोजन केले जात असल्याचे एसटी महामंडळाकडून सांगण्यात आले.

### उत्पन्नवाढीस होणार मदत

एसटी महामंडळाकडून सण-उत्सवा- दरम्यान प्रवाशांसाठी विशेष बससेवेचे नियोजन केले जाते. यंदाही श्रावण महिन्यात बससेवेचे नियोजन करण्यात आले. यामधून महामंडळाला अधिक उत्पन्न मिळण्यास मदत होणार आहे. त्या दृष्टिकोनातून महामंडळाकडून प्रयत्न केले जात आहेत.